पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला अमरावती ■ वर्ष १५ ■ अंक १८६ ■ सोमवार, दि. १२ जानेवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com




# जिल्हा परिषद निवडणुका पुन्हा लांबणीवर पडणार?

## राज्य निवडणूक आयोगाचा सर्वोच्च न्यायालयात अर्ज, मुदतवाढ देण्याची मागणी

प्रतिनिधी १२जानेवारी

**मुंबई :** राज्यातील प्रलंबित जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या बाबतीत राज्य निवडणूक आयोगाला सर्वोच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. या निवडणुका पूर्ण करण्यासाठी न्यायालयाने आयोगाला १५ दिवसांची मुदतवाढ दिली असून आता १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे निवडणुकांच्या घोषणेची प्रतीक्षा करणाऱ्या राजकीय कार्यकर्त्यांना आता आणखी काही दिवस वाट पाहावी लागणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी महाराष्ट्रातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश दिले होते. मात्र, प्रशासकीय अडचणी आणि प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी अधिक वेळ हवा असल्याने आयोगाने १० फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ मागितली होती. आज या अर्जावर सुप्रीम कोर्टात सुनावणी पार पडली. सुप्रीम कोर्टाने राज्य निवडणूक आयोगाची विनंती मान्य केली आहे. राज्य निवडणूक आयोगाला जिल्हा परिषद निवडणुकांसाठी १५ दिवसांची मुदतवाढ दिली असून, आता १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत ज्या जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमधील ५० टक्क्यांची आरक्षण मर्यादा ओलांडली गेली नाही.

### नवीन याचिकेने वाढले टेन्शन!

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ५० टक्के आरक्षण मर्यादेचा मुद्दा कळीचा ठरला आहे. १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्या येथे आरक्षण ५० टक्क्यांच्या आत असल्याने त्यांच्या निवडणुका घेण्यास तांत्रिक अडचण नाही. २० जिल्हा परिषदांमध्ये आरक्षणाची मर्यादा ओलांडली गेली असल्याने त्यांच्या निवडणुकांवर प्रश्नचिन्ह आहे. दरम्यान, सोलापूर जिल्ह्यातून एक नवीन याचिका दाखल करण्यात आली आहे. नगरपालिका आणि महापालिकांप्रमाणेच ५० टक्के मर्यादा ओलांडलेल्या जिल्हा परिषदांच्या निवडणुकाही न्यायालयीन निकालाच्या अधीन राहून एकाच वेळी घेण्यात याव्यात, अशी मागणी या याचिकेत करण्यात आली आहे.

### एकत्रित की टप्प्याटप्प्याने पेच कायम?

सध्या राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचा धुराळा उडालेला आहे. या निवडणुका संपण्यापूर्वीच जिल्हा परिषदांच्या निवडणुका जाहीर होतील, असा अंदाज वर्तवला जात होता. मात्र, आता १५ फेब्रुवारीपर्यंत मुदत मिळाल्यामुळे जिल्हा परिषद निवडणुका काहीशा लांबणीवर पडल्या आहेत. आता राज्य निवडणूक आयोग केवळ आरक्षणाची मर्यादा न ओलांडलेल्या जिल्हा परिषदांची निवडणूक घेते की सर्वच जिल्ह्यांचा पेच सुटेपर्यंत थांबते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.



# आज ना. प्रतापराव जाधव तर उद्या ना. संजय राठोड अकोल्यात

प्रतिनिधी १२जानेवारी

**अकोला :** महानगरपालिकेच्या प्रचारार्थ मंत्री आयुष आरोग्य व कुटुंबकल्याण राज्यमंत्री भारत सरकार ना. प्रतापराव जाधव यांचे १२ जानेवारीला दुपारी १२ वाजता अकोल्यात आगमन होणार आहे. त्यानंतर महानगरपालिका निवडणुकीच्या उमेदवाराच्या प्रचारार्थ विविध ठिकाणी बैठकांना उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर ते मातोश्री शिवाजी नगर मेहकरकडे प्रस्थान करतील. तसेच यवतमाळ पालकमंत्री तथा मृद व जलसंधारण मंत्री ना. संजय राठोड हे १३ जानेवारीला सकाळी ११ वाजता अकोल्यात येणार आहेत. महानगरपालिका निवडणुकीत शिवसेना उमेदवारांच्या प्रचारात ते सहभागी होणार आहेत. त्यानंतर आर.जी. हॉटेल मूर्तिजापूर रोड, अकोला येथे रात्रीचा मुक्काम राहणार आहे.

# जिजाऊंचे संस्कार आणि स्वामी विवेकानंदांचे विचार राष्ट्र उभारणीसाठी प्रेरक - आमदार रणधीर सावरकर



प्रतिनिधी १२जानेवारी

**अकोला :** 'हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेत राजमाता जिजाऊंची भूमिका अत्यंत मोलाची होती. शिवरायांवर स्वराज्याचे संस्कार करणाऱ्या विदर्भाच्या कन्या माँ जिजाऊंचे चरित्र आजच्या पिढीने वाचणे काळाची गरज आहे. तसेच स्वामी विवेकानंदांचे विश्वबंधुत्वाचे आणि आधुनिक विज्ञानाचे विचार तरुणाईला सकारात्मक दिशा देणारे आहेत,' असे प्रतिपादन आमदार रणधीर सावरकर यांनी केले. भारतीय जनता पक्ष कार्यालयात आयोजित राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद आणि शेगाव येथील श्री गजानन महाराज संस्थानचे विश्वस्त कर्मयोगी शिवशंकरभाऊ पाटील यांच्या जयंतीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमादरम्यान आमदार सावरकर यांनी महापुरुषांच्या कार्याचा गौरव केला. स्वामी विवेकानंद हे आधुनिक विज्ञानाचे पुरस्कर्ते असून त्यांनी भारतीय संस्कृतीचे महत्त्व जगाला पटवून दिले, असे त्यांनी नमूद केले. तसेच, गजानन महाराज संस्थानला शिस्त आणि नवी दिशा देणारे शिवशंकरभाऊ पाटील यांच्या कार्याचेही त्यांनी स्मरण केले.

या कार्यक्रमाला अकोल्याचे खासदार अनुप धोत्रे यांची प्रमुख उपस्थिती होती.

त्यांच्यासह माजी महापौर विजय अग्रवाल, जयंत मसने, अॅड. देवाशिष काकड, माधव मानकर, गणेश तायडे, डॉ. अमित कावरे, मनीष बाछुका यांनी महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी नितीन राऊत, शरद तुरकर, संजय जोशी, राम बोंद्रे, उज्वल बामणे, सुभाष खंडारे, सागर शेगोकार, रामदास सरोदे, शिवा हिंगणे, रिचा शहा, ऋचा पाटील यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# अकोल्यात प्रचाराचा 'सुपर मन्डे'!

## महापालिकेचा प्रचार माहोल रंगात : सकाळपासूनच उमेदवार मतदारांच्या दारात

प्रतिनिधी १२जानेवारी

**अकोला :** जसजशी मतदानाची वेळ जवळ येत आहे तसतशी सर्वच पक्षांच्या उमेदवारांच्या आणि कार्यकर्त्यांच्या अंगात ऊर्जा संचारत आहे. दिवसभर पायाला भिंगरी बांधल्यागत व्यस्त कार्यक्र पार पाडल्यानंतर रात्री उशिरापर्यंत समीकरणांवर खलबते सुरू असताना दिसून येत आहे. रविवार तर प्रचारासाठी 'सुपर मन्डे'च ठरला.

सकाळपासूनच उमेदवार आपल्या कार्यकर्त्यांसोबत घराबाहेर पडून संपूर्ण वॉर्डात पदयात्रा काढली. यावेळी वॉर्डातील लोकंही या पदयात्रेत सहभागी झाल्याचे दिसून आले. कार्यकर्ते प्रचार पत्रके वाटत होत तर महिला कार्यकर्त्या घरातील महिलांशी हितगुज करताना दिसत होत्या. काही उत्साही कार्यकर्ते उमेदवाराच्या नावाने घोषणा करीत असल्याने संपूर्ण वॉर्डात निवडणुकीचा मोहाल दिसून येत होता. तर काही पक्षांनी शहरातून दुचाकी प्रचार रॅली काढून आपले शक्तीप्रदर्शनही केले. काँग्रेस व वंचित वगळता सर्वच पक्षांच्या वरिष्ठ पातळीवरील नेत्यांच्या शहरात प्रचंड प्रचार सभा पार पडल्या आहेत. त्यामुळे उमेदवारांममध्ये उत्साह संचारला आहे. ते आणखी जोमाने प्रचाराला लागले आहेत.



### प्रचारात भाजपची आघाडी

अकोला महानगर पालिका निवडणुकीत भाजपा पक्षाने आघाडी घेतल्याचे दिसून येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री तथा भाजपचे राज्य निवडणूक प्रमुख चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रचंड जनसमुदायात प्रचार सभा पार पडल्या आहेत. त्याचप्रमाणे वॉर्डा-वॉर्डात आणि सभांमध्ये अकोल्याचे खा. अनुप धोत्रे, आ. रणधीर सावरकर सातत्याने फिरत प्रचार करताना दिसून येत आहेत. तर दुसरीकडे शिंदेच्या शिवसेनेच्या प्रचारासाठी खुद्द उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे अकोल्यात आल्याने उमेदवारांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. मात्र इतर पक्षाचे वरिष्ठ नेत्यांनी अकोला महापालिकेच्या निवडणुकीकडे दुर्लक्ष केल्याने उमेदवारांसह मतदारांमध्ये एकप्रकारे निरूत्साह दिसून येत आहे.

### प्रशासकीय यंत्रणेचा मतदार जनजागृतीवर भर

महापालिका निवडणुकीत प्रशसकीय यंत्रणाही पूर्ण ताकदीनिशी उतरली असून, मतदारांमध्ये मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येत आहे. पथनाट्ये, रॅली या माध्यमातून लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होण्यासाठी नागरिकांना आवाहन करीत आहे. शाळा, महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या मतदार जनजागृती रॅली काढून लोकांना निर्भीडपणे व निष्पक्षपातीपणे मतदान करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. तसेच प्रशासकीय यंत्रणेची निवडणूक तयारीही अंतिम टप्प्यात पोहोचली असून, वरिष्ठ अधिकारी वारंवार मतदान आणि तत्ससंबंधित बाबींचा आढावा घेत आहेत.

### भाजपसाठी प्रतिष्ठेची तर इतरांची अस्तित्वासाठी लढाई

अकोला निवडणूक सर्वार्थाने चर्चेचा विषय ठरत आहे. भाजपाला या निवडणुकीत आपली प्रतिष्ठा कायम ठेवायची असल्याने ते प्रचाराला जोमाने लागले आहेत. वॉर्डातील एकही उमेदवार प्रचारातून सुटू नये, प्रत्येकापर्यंत आपल्या उमेदवाराचे कार्य पोहोचले पाहिजे, यासाठी त्यांची धावपळ सुरू आहे. तर काँग्रेस, वंचित, दोन्ही शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार, एमआयएम, हे पक्ष आपले अस्तित्व टिकविण्यासाठी किंवा निर्माण करण्यासाठी जीवतोड मेहनत करताना दिसून येत आहे. एकूणच ही निवडणूक विकासाऐवजी प्रतिष्ठा विरूद्ध अस्तित्व अशीच होत असल्याचे दिसून येत आहे.

# डोनाल्ड ट्रम्प व्हेनेझुएलाचे स्वघोषित राष्ट्राध्यक्ष!

**नवी दिल्ली :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यामुळे पुन्हा एकदा आंतरराष्ट्रीय राजकारमणात मोठी खळबळ उडाली आहे. ट्रम्प यांनी त्यांच्या सोशल मीडिया अकाऊंटवर एक वादग्रस्त पोस्ट शेअर केल आहे. या पोस्टमध्ये त्यांनी स्वतला व्हेनेझुएलाचे कार्यकारी अध्यक्ष म्हटले आहे. त्यांच्या या पोस्टमुळे जागतिक स्तरावर वेगवेगळ्या प्रतिक्रिया उमटल्या आहेत. व्हेनेझुएलामध्ये या पोस्टमुळे संतापाची लाट उसळली आहे.


# कोस्टल रोड, समृद्धीचं श्रेय आमचंच - देवेंद्र फडणवीस

प्रतिनिधी १२जानेवारी

**मुंबई :** मुंबई महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने मुंबईतील विकासकामांबाबत श्रेयवादाची लढाई सुरू झाली आहे. कोस्टल रोड, समृद्धी महामार्ग, मुंबई मेट्रोचं श्रेय उद्धव ठाकरे यांनी घेतलं आहे. तर, ही कामं होण्यामागे भाजपाची मेहनत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणालेत. या श्रेय वादाच्या लढाईतून दोन्ही पक्षांनी एकमेकांना आव्हान-प्रतिआव्हानही देऊन झाले.

कोस्टल रोड हा मुंबईतील ड्रीम प्रोजेक्ट आहे. याची संकल्पना ठाकरेंनी मांडली होती. त्यांच्याच हस्ते भूमिपूजनही झालं होतं. पण या प्रकल्पाचं श्रेय भाजपा घेत आहे, याबाबत विचारलं असता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, कोस्टल रोडची संकल्पना त्यांची नाही. ही संकल्पना खूप आधीच मांडली गेली होती. पृथ्वीराज चव्हाण होते तेव्हा त्यांनीही कोस्टल रोड करणार असल्याचं म्हटलं होतं.







CMYK

सिटी न्यूज अमरावती
सोमवार, दि. १२ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# भाजपा उमेदवारांसाठी प्रविण पोटे पाटील यांचा प्रचाराचा झंझावात

प्रतिनिधी १२ जानेवारी

**अमरावती:** अमरावती महानगरपालिका निवडणूक २०२६च्या पार्श्वभूमीवर माजी राज्यमंत्री प्रविण पोटे पाटील यांनी भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांसाठी जोरदार प्रचाराला सुरुवात केली आहे. महानगरपालिका क्षेत्रातील सर्व प्रभागांमध्ये सभा, कॉर्नर मीटिंग्स आणि नागरिकांशी थेट संवाद साधत त्यांनी प्रचाराचा झंझावात निर्माण केला आहे.

या प्रचारादरम्यान अमरावती शहरासाठी असलेला विकासात्मक व्हिजन, आतापर्यंत करण्यात आलेली विकासकामे तसेच भविष्यातील योजनांची सविस्तर मांडणी नागरिकांसमोर करण्यात येत आहे. शहरातील पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, वाहतूक यांसारख्या मूलभूत समस्यांचे कायमस्वरूपी



निराकरण करण्यासाठी भारतीय जनता पार्टी कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच अमरावतीचा औद्योगिक क्षेत्रात वेगाने विकास व्हावा, रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात आणि शहराचा सर्वांगीण विकास साधावा, यासाठी सक्षम नेतृत्वाची गरज असल्याचे प्रविण पोटे पाटील यांनी स्पष्ट केले. यासाठी महानगरपालिकेतील प्रत्येक प्रभागातून भारतीय जनता पार्टीचे उमेदवार निवडून देण्याचे आवाहन त्यांनी अमरावतीकर नागरिकांना केले आहे.

यावेळी खा. अनिलजी बोंडे, आ. राजेश वानखडे, आ. राजेश बकाने, आ. प्रविण तायडे, जयंत डेहनकर, शिवराय कुळकर्णी, नितीन गुडधे, उपस्थित होते.

प्रविण पोटे पाटील यांच्या या प्रचार दौऱ्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून भाजपाच्या प्रचाराला अधिक गती मिळत असल्याचे चित्र शहरात दिसून येत आहे.

# जसापूरवासीयांनी दिला गजानन वारीतून एकात्मतेचा संदेश

प्रतिनिधी १२ जानेवारी

## जसापूर (भडांगे) येथून श्रीक्षेत्र शेगावकडे निघाली भक्तिभावाने ओतप्रोत पालखी पायदळ वारी

**दर्यापूर:** जसापूरवासीयांनी गजानन माऊली वारी पालखी सोहळ्यातून एकात्मतेचा संदेश दिला असून संपूर्ण गावामध्ये सडा-सारवण, रांगोळ्यांतून श्रद्धा उमटली आहे. गाव गाड्याच्या संस्कृतीचे जतन करून जाती–धर्माच्या पलीकडे भक्ती पोहोचली आहे.

श्री. संत भैय्याजी महाराज जसापूर (भडांगे) ते श्रीक्षेत्र शेगावकडे या पवित्र पालखी पायदळ वारी भक्तिभावपूर्ण वातावरणात बुधवारी, ७ जानेवारीला ही दिंडी मोठ्या उत्साहात शेगावकडे रवाना झाली. ह.भ.प. रामकृष्ण महाराज अकोटकर यांच्या मार्गदर्शनाखाली व ह.भ.प. धनेश महाराज ढोके व ह.भ.प. प्रदीप रोडे महाराज यांच्या उपस्थितीत हा सोहळा भक्तीमय वातावरणात संपन्न होत आहे. ही दिंडी दिनांक ११ जानेवारी रोजी श्री. क्षेत्र शेगाव येथे पोहोचणार असून तेथे पालखी सोहळ्याचा समारोप करण्यात येणार आहे. वारीच्या प्रारंभी गावातील



मंदिरामध्ये पालखीची विधीवत पूजा-अर्चा करण्यात आली. त्यानंतर संपूर्ण गावातून पालखीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. पालखीच्या स्वागतासाठी प्रत्येक घरासमोर मोठमोठ्या रांगोळ्या काढण्यात आल्या, सडा-सारवण करून पाणी शिंपण्यात आले. ‘जय गजानन माऊली’च्या जयघोषात दिंडीतील भाविक पावल्या खेळत पुढे सरकत होते. प्रत्येक घरासमोर पालखीचे पूजन करण्यात येत होते. हे भक्तीमय दृश्य पाहून संपूर्ण गाव अक्षरशः माऊलीच्या गजरात न्हाऊन निघाले. जसापूर (भडांगे) वासीयांनी या पालखी सोहळ्याच्या माध्यमातून भक्तीचा जागर करत गजानन महाराजांवरील आपली अपार श्रद्धा व्यक्त केली. भक्ती, एकता आणि संस्कारांचा संगम असलेला हा पालखी सोहळा परिसरात भाविकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. या पालखी सोहळ्यात सेवाधारी आशिष काळे, विणेकरी ह.भ.प. प्रतीक महाराज भडांगे, गायनाचार्य ह.भ.प. विठोबा पांडे, ह.भ.प.पवन काढणे, ह.भ.प.विनोद भडांगे, ह.भ.प. ज्ञानेश्वरी पाटेकर, ह.भ.प. विजयाताई रोडे, मृदंगाचार्य ह.भ.प.गजानन भारसाकडे, ह.भ.प. जय पाटेकर, ह.भ.प. गोकुळ राऊत, ह.भ.प. विलास भडांगे, ह.भ.प. ऋषिकेश मेहरे, मधुकर मेहरे, प्रवीण नागे, सुनील भडांगे, अल्पेश, सोहम राऊत यांच्यासह जसापूर (भडांगे), नायगाव, भांबोरा, आराळा आदी गावांतील असंख्य गजानन भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

**जाती-धर्माच्या पलीकडे भक्ती...**

गेल्या सात वर्षांपासून जसापूर (भडांगे) गावातून शेगावकडे ही पायदळ वारी अखंडपणे निघत असून या वारीचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे सर्व जाती-धर्मातील नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग. या पालखी सोहळ्याच्या माध्यमातून जसापूरवासीयांनी धर्मसहिष्णुता, सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला आहे. धर्मसहिष्णुतेचा संदेश देणारी जसापूर (भडांगे) ते शेगाव पालखी पायदळ वारी जाती-धर्माच्या पलीकडे भक्तीमय वातावरणात रवाना झाली असून सात वर्षांची भक्तीची परंपरा जोपासली आहे.

# चंद्रशेखर बावनकुळे व नितेश राणे यांची जाहीर सभा

प्रतिनिधी १२ जानेवारी

**अमरावती :** अमरावती महानगरपालिकेच्या नगरसेवकाच्या प्रचारार्थ भाजपच्या वतीने मंत्री नितेश राणे व राज्याचे महसूल मंत्री व अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या वेगवेगळ्या जाहीर सभा शहरात ठीक ठिकाणी आयोजित करण्यात आले आहे.

यामध्ये अमरावती महानगरपालिका निवडणूक भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ पालकमंत्री मा.ना. चंद्रशेखरजी बावनकुळे यांची सोमवार, १२ जानेवारी



२०२६

सकाळी १०.०० वाजता डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख कॉलनी मैदान, अमरावती,

सकाळी ११.०० वाजता ज्युपिटर मैदान, बुध्दविहार समोर, किशोर नगर, अमरावती, दुपारी १२.०० वाजता साईरत्न लॉन, साईनगर, अमरावती दुपारी १.०० वाजता अडवाणी ले-आऊट, जनता कॉलनी नं. २, अमरावती आयोजित करण्यात आली असून मंत्री नितेश राणे यांची प्रचार सभा सोमवार, १२ जानेवारी २०२६ सायं. ६.०० वाजता शिवनगर, जयसियाराम नगर, बजरंग नगर मैदान, अमरावती

,सायं. ७.३० वाजता संत सितारामबाबा मैदान, बालाजी प्लॉट, अमरावती आयोजित करण्यात आली आहे. या प्रचार सभेला सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व मतदारांनी उपस्थित राहण्याचे आव्हान भारतीय जनता पार्टी अमरावती शहर (जिल्हा) यांनी केले आहे.

# सावित्रीबाई फुले जयंती दिनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

प्रतिनिधी १२ जानेवारी

**अमरावती :** कायम समाजकार्य, शिक्षण, विद्यार्थ्यांचा विकास यासाठी अविरत कार्य करत असतांना नवीन वर्षाचे अवचित साधत तसेच सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्ताने ज्यांना पद उदयन वेल्फेअर फाउंडेशन च्या वतीने ग्राम नेम कुंड तालुका चिखलदरा मेळघाट येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले व राष्ट्रमाता मा जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन हार अर्पण करून जिजाऊ वंदनेने करण्यात आले कार्यक्रमाच्या



## जनपद उदयन वेल्फेअर फाउंडेशन चे उपक्रम

अध्यक्षस्थानी जनपद उदयन वेल्फेअर फाउंडेशनच्या संस्थापिका कांचनताई उल्हे हरिदास उल्हे, राधा उल्हे यांसह गावातील प्रतिष्ठित नागरिक अनिल अकोले, उपसरपंच रमाबाई आठवले अध्यक्ष स्थानिक संस्था रत्नाबाई नागले, शाळेच्या शिक्षिका स्वाती कविता यांची उपस्थिती होती. बाकी प्रत्येकाची कार्यक्रमात बोलताना कांचन ताई उल्हे यांनी उदयन वेल्फेअर फाउंडेशन चे कार्य तसेच असलेले उद्दिष्ट विशद केले बहुसंख्य विद्यार्थी आदिवासी समुदायातून येणाऱ्या शाळांमध्ये वया चित्रकलेसाठी लागणारे साहित्य पेन पेन्सिल यांसारख्या मूलभूत शैक्षणिक साहित्याचे वितरण करणे अत्यंत आवश्यक आहे शाळेतील शिक्षकांशी झालेल्या थोडक्यात चर्चेतून असे माहिती झाले की शैक्षणिक साधने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रगतीत मोठा आणि सकारात्मक बदल घडून आणत असतात त्यामुळे शहरी व ग्रामीण विद्यार्थ्यांमधील शिक्षणातली दरी कमी होण्यासाठी मोलाची मदत होणे गरजेचे आहे जनपद उदयन वेल्फेअर फाउंडेशन समानतेच्या तत्त्वावर ठाम विश्वास ठेवते आणि प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्वक शिक्षणाची समान संधी मिळावी यासाठी कटिबद्ध आहे जेणेकरून हे विद्यार्थी भविष्यात राष्ट्राच्या अभिरुद्धीमध्ये सक्रिय व सकारात्मक योगदान देऊ शकतील अशी माहिती दिली कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेच्या मुख्याध्यापिका लिहिण्याचा पवार यांनी केले सूत्रसंचालन व आभार राधा उल्हे यांनी केले. मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून अल्पोपहाराने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# मातृतीर्थ सिंदखेड राजा येथे राजमाता जिजाऊ जन्मोत्सव १२ जानेवारीला

प्रतिनिधी १२ जानेवारी

## मराठा सेवा संघाच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन

**अकोला:** राजमाता जिजाऊ यांच्या पावन जन्मोत्सव आगामी १२ जानेवारी रोजी त्यांची पावन जन्मभूमी मातृतिर्थ सिंदखेड राजा येथे मोठ्या जल्लोषात व विविध उपक्रमाच्या अनुषंगाने साजरी होत असून या जन्मोत्सव सोहळ्यात शिवप्रेमी महिला पुरुषांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन मराठा सेवा संघाच्या जिल्हा शाखेत संपन्न झालेली पत्रकार परिषदेच्या वेळी करण्यात आले. ४ जानेवारी ते १२ जानेवारीपर्यंत होणारे मा जिजाऊ जन्मोत्सवात विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. जन्मोत्सव दिले सिंदखेडराजातील राजवाडा येथे सकाळी सहा वाजता महापूजा करण्यात येणार असून त्यानंतर भव्य पालखी व वारकरी दिंडी निघणार आहे सकाळी दहा वाजता शिवधर्म ध्वजारोहण जिजाऊ सृष्टी येथे होणार आहे दुपारी तीन वाजता शिवधर्म पुष्ठावरून मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष शिवश्री पुरुषोत्तम खेडेकर हे जिजाऊ भक्तांना संबोधित करून सोहळ्याची सांगता होईल यावेळी मराठा सेवा संघ पुरस्कार वितरण करण्यात येणार आहे १३ जानेवारी रोजी शिनखेड येथे संत चोखामेळा महाराज जन्मोत्सव व समाज प्रबोधन सोहळा होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. मा जिजाऊ रथ गावोगावी संचार करीत असून आतापर्यंत पाचशे गावांशी संपर्क करण्यात आला आहे. या रथांच्या प्रारंभ दिनांक २८ डिसेंबर रोजी सेवा संघर्षाचे संस्थापक पुरुषोत्तम खेडेकर यांच्या हस्ते करण्यात आला आहे त्याचप्रमाणे सेवा संघाच्या जिल्हा शाखेच्या वतीने रंगभरण चित्रकला, निबंध ,व वक्तृत्व स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आली आहे. ही वक्तृत्व स्पर्धा दिनांक १० जानेवारी रोजी सकाळी आठ वाजता मराठा सेवा संघ कार्यालय जुना आरटीओ रोड इथे होणार असून उर्वरित स्पर्धा स्पर्धकांच्या शाळेत महाविद्यालयात घेतल्या जाणार आहेत या सर्व स्पर्धांच्या पारितोषिक वितरण सोहळा दिनांक १८ जानेवारी रोजी सकाळी दहा वाजता मराठा सेवा संघाच्या कार्यालयात मान्यवरांच्या उपस्थित होणार असून या स्पर्धेमध्ये विद्यार्थी व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग व्हावे असे आवाहन यावेळी करण्यात आले. दिनांक १२ जानेवारी रोजी सिंदखेड राजा येथे जाणाऱ्या सर्व शिवप्रेमी महिला पुरुष नागरिकांचे स्वागत पंकज जायले यांच्या पातुरस्त्यावरील राजदीप फॉर्म हाऊस येथे करण्यात येणार असून येथे वाहनांना स्टिकर व झेंडे देऊन अल्प उपहार आणि त्यांची विदाई करण्यात येणार आहे असल्याचे यावेळी सांगण्यात आले या पत्रकार परिषद यावेळी मराठा सेवा संघाचे अकोला जिल्हा अध्यक्ष डॉक्टर रणजीत कोरडे अध्यक्ष कोशास अध्यक्ष अशोक पटोकार जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हा अध्यक्ष रेणुताई गावंडे संभाजी ब्रिगेटर चे मार्गदर्शक डॉक्टर पुरुषोत्तम तायडे केंद्रीय कार्यालय सदस्य प्राध्यापक प्रदीप चोरे सेवा संघाचे राज्य संघटक प्राध्यापक प्रशांत जानवरकर प्रचार रथ प्रमुख पंकज जायले सेवा संघाचे जिल्हा सचिव संदीप निर्मळ डॉक्टर विजयराजे टाले आनंद पाटील सुकळीकर संजय इंगळे दिलीप देशमुख विनोद साबळे देवराव पाटील हा घे दिवाकर पाटील अरुण गावंडे प्रदीप बिहाडे अतुल अंधारे समेत बहुसंख्य महिला व पदाधिकारी उपस्थित होते.

# राज्यातील २९ महानगरपालिका निवडणूक क्षेत्रात १५ जानेवारी रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर

**अमरावती:** राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी गुरुवार, दि. १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित मतदान क्षेत्रात १५ जानेवारी २०२६ रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आल्याची अधिसूचना राज्य शासनाने प्रसिद्ध केली आहे. अधिसूचना सर्व विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, महामंडळे, मंडळे इत्यादींच्या निदर्शनास आणण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ही सार्वजनिक सुट्टी संबंधित महानगरपालिका निवडणूक क्षेत्रातील मतदारसंघाबाहेर कामानिमित्त असलेल्या मतदारांनाही लागू राहणार आहे. महानगरपालिका क्षेत्रांतील केंद्रशासनाची कार्यालये, निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक सुट्टी लागू असलेल्या महानगरपालिकांमध्ये अमरावतीसह बृहन्मुंबई, ठाणे, नवी मुंबई, उल्हासनगर, कल्याण–डोंबिवली, भिवंडी–निजामपूर, मीरा–भाईंदर, वसई विरार, पनवेल, नाशिक, मालेगाव, जालना, लातूर, अकोला, नागपूर आणि चंद्रपूर यांचा समावेश आहे.

# शहरात दहशत माजवणारा चाकूधारी गुंड पोलिसांच्या जाळ्यात

प्रतिनिधी १२ जानेवारी

**अमरावती :** महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा-सुव्यवस्थेला आव्हान देणाऱ्या गुन्हेगारी प्रवृत्तीविरोधात अमरावती पोलिसांनी कडक पावले उचलली आहेत. शहरात दहशत निर्माण करत धारदार शस्त्रासह वावरणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला गुन्हे शाखेच्या पथकाने रंगेहाथ अटक केली. नवी वस्तीतील मिलचाल परिसरात एक व्यक्ती हातात चाकू घेऊन नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करत असल्याची गोपनीय माहिती गुन्हे शाखेला मिळाली होती. या माहितीच्या

**हत्यारासह अटक; अमरावती पोलिसांची धडक कारवाई**

आधारे पोलिसांनी तात्काळ सापळा रचून संशयिताला ताब्यात घेतले. तपासादरम्यान त्याच्याकडून धारदार चाकू जप्त करण्यात आला.

अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव उमेश महादेवराव मेघाम (वय ३०, रा. मिलचाल, नवी वस्ती, बडनेरा) असे असून, तो यापूर्वीही शहरात दहशत माजवणाऱ्या प्रकारांमध्ये सहभागी असल्याची माहिती पोलिसांकडे आहे. आरोपी आदेश झुगारून सार्वजनिक ठिकाणी शस्त्र घेऊन वावरत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट खामगाव

# विविध मागण्यांसाठी उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर धरणे

प्रतिनिधी १२ जानेवारी

**खामगाव :** अनुसूचित जाती-जमातीतील नागरिकांवर होत असलेल्या अन्याय व अत्याचारप्रकरणी तातडीने कारवाई करण्यात यावी, यासह विविध मागण्यांसाठी खामगाव येथील उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयासमोर अनुसूचित जाती-जमातीतील नागरिकांनी ११ जानेवारीपासून धरणे आंदोलन सुरू केले आहे.

या संदर्भात आंदोलनकर्त्यांनी उपविभागीय अधिकारी यांना निवेदन सादर केले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, खामगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात अट्रॉसिटी अक्ट अंतर्गत दाखल झालेल्या गुन्ह्यातील आरोपींना तत्काळ अटक करण्यात यावी. तसेच खामगाव ग्रामीण येथील गुन्ह्यातील आरोपी व त्यांचे नातेवाईक यांच्याविरुद्ध खोटा अदखलपात्र गुन्हा नोंदविणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करून तो गुन्हा रद्द करण्यात यावा.


यासोबतच उपविभागीय पोलिस अधिकारी तसेच तपास अधिकाऱ्यांनी कर्तव्यात कसूर केल्याचा आरोप करत त्यांची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली आहे. अशा विविध मागण्यांसाठी हे आंदोलन सुरू असून, या धरणे आंदोलनात अनुसूचित जाती-जमातीतील महिला व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

# रेतीच्या अवैध वाहतुकीवर महसूल प्रशासनाची नजर !

## डोलारखेड, भोनगाव फाट्याजवळ तपासणी नाका

प्रतिनिधी १२ जानेवारी

**खामगाव:** गेल्या अनेक दिवसांपासून एकाच रॉयल्टी वर दिवस-रात्र रेतीची अवैध वाहतूक सुरू असल्याच्या तक्रारी सातत्याने महसुल विभागाकडे प्राप्त होत होत्या. या पार्श्वभूमीवर अखेर महसूल प्रशासनाने थेट रस्त्यावर उतरून कारवाई सुरू केली आहे. शेगाव तालुक्यातील डोलारखेड, भोनगाव फाट्याजवळ तपासणी नाका उभारण्यात आला असून, अवैध वाहतुकीवर नजर ठेवली जात आहे. पूर्णा नदीपात्रातील कठोरा, भास्तन, हिंगणा, भोटा या रेती घाटाकडून खामगाव व शेगावकडे जाणाऱ्या प्रत्येक वाहनाची सखोल तपासणी केली जात असून, रॉयल्टीची काटेकोर पडताळणी करण्यात येत आहे. ही कारवाई उपविभागीय अधिकारी डॉ. रामेश्वर पुरी व शेगाव तहसीलदार प्रज्ञा काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे. यासाठी विशेष पथकाची नियुक्ती केली असून, या पथकात नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी व कोतवाल यांचा समावेश आहे. कोणतीही अनियमितता आढळल्यास तलाठी व तत्काळ कारवाईचे संकेत देण्यात आले आहेत. या कारवाईमुळे अवैध रेती वाहतूक करणाऱ्यांमध्ये घबराट पसरली आहे. मात्र, ही कारवाई केवळ कागदापुरती किंवा काही दिवसांपुरती मर्यादित न राहता सातत्याने सुरू ठेवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



# पालकमंत्री आकाश फुंडकर यांची आज सायंकाळी संवाद सभा

प्रतिनिधी १२ जानेवारी

**अकोला:** राज्याचे कामगार मंत्री तथा पालकमंत्री आकाश फुंडकर महानगरपालिकेतील भारतीय जनता पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस युती उमेदवारांच्या प्रचारार्थ १२ जानेवारी रोजी सायंकाळी साडेसहा वाजता रौनक मंगल कार्यालय येथे जनतेशी संवाद साधणार आहेत. तसेच सायंकाळी साडेसात वाजता जेतवन नगर खदान संवाद सभा तसेच रात्री साडेआठ वाजता डाबकी रोड राजकमल हॉटेल येथे संवाद सभेला



मार्गदर्शन करणार आहेत. त्या भागातील नागरिकांनी संवाद सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे. मतदान जवळ आल्यामुळे सभांना विशेष महत्त्व आहे.

# विचारांशी गद्दारी करणाऱ्यांपासून सावध राहा!

प्रतिनिधी १२ जानेवारी

## ◆ भाजपा लोकप्रतिनिधींचे आवाहन



**अकोला :** 'हिंदुत्व हेच खरे राष्ट्रीयत्व आहे. ज्या पक्षाचा, ज्या नेत्याचा विचार, कृती आणि आचरण हिंदुत्वाशी निष्ठावान आहे, तोच देशाच्या हितासाठी काम करू शकतो. जे हिंदू समाजाचा द्वेष करतात, समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न करतात, अशा शक्तींपासून सावध राहा आणि भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांना प्रचंड मताधिक्याने विजयी करा, असे आवाहन भाजपचे प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर यांनी केले.

अकोला महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक तीनमध्ये नागरिकांशी थेट संवाद साधताना आमदार सावरकर यांनी विरोधकांवर हल्लाबोल केला. 'राजकारणात केवळ व्यक्ती नव्हे, तर पक्षाची विचारधारा आणि संस्कृती महत्त्वाची असते. आयुष्यभर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारांवर काम करणाऱ्या, संघटन वाढीसाठी झटणाऱ्या निष्ठावान कार्यकर्त्यांना संधी देणे ही काळाची गरज आहे,' असे त्यांनी ठणकावून सांगितले. अकोला शहर सध्या सांस्कृतिक, सामाजिक आणि प्रशासकीय अनेक आव्हानांशी झुंज देत आहे. अशा परिस्थितीत शहराचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी भारतीय जनता पक्ष सत्तेत येणे आवश्यक असल्याचे सावरकर यांनी स्पष्ट केले. महापौरपद मिळवण्यासाठी प्रत्येक भाजप उमेदवाराचा विजय महत्त्वाचा आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकासाभिमुख विचारांना प्राधान्य देणारे उमेदवारच अकोल्याला पुढे नेऊ शकतात, असेही त्यांनी ठामपणे सांगितले.

या कार्यक्रमाला अकोला अर्बन बँकेचे माजी अध्यक्ष व संचालक रामेश्वर कुंडकर, गोरक्षा चळवळीत कार्यरत ज्येष्ठ स्वयंसेवक माणिकराव नालट, प्रकाश शेगोकार यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाजपाच्या या आक्रमक प्रचारामुळे प्रभागात राजकीय वातावरण तापले असून, विरोधकांच्या गोटात अस्वस्थता वाढल्याचे चित्र आहे.

# अकोला महानगरपालिका निवडणूकीत प्रशासन अग्रेसर

प्रतिनिधी १२ जानेवारी

## ◆ ६५० कर्मचाऱ्यांमार्फत 'वोटर स्लीप' वाटप सुरू



**अकोला:** महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ ची रणधुमाळी सध्या शहरात सुरू आहे. या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी आणि मतदारांना केंद्रावर कोणताही त्रास होऊ नये, यासाठी मनपा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ. सुनील लहाने यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासन 'अ?क्शन मोड' मध्ये आले आहे.

शहरातील २० प्रभागांमधील मतदारांना घरोघरी जाऊन 'वोटर स्लीप' (मतदार चिठ्ठी) वाटप करण्याचे काम युद्धपातळीवर हाती घेण्यात आले आहे.अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने यांच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली सुरू असलेल्या या मोहिमेसाठी अकोला महानगरपालिकेने मोठे मनुष्यबळ तैनात केले आहे. शहरात ५० पर्यवेक्षकांच्या मार्गदर्शनाता एकूण २० प्रभागांतील कामावर नियंत्रण ठेवण्यात आले आहे. सुमारे पाचशे बी.एल. ओ प्रत्यक्ष मतदार यादीनुसार स्लीप वाटपासाठी नियुक्त केले गेले आहे. त्याच बरोबर समन्वय व जागृतीसाठी दीडशे आशा वर्कर कार्यरत आहे. अशा प्रकारे एकूण ६५० कर्मचाऱ्यांची फौज शहराच्या कानाकोपऱ्यात जाऊन मतदारांपर्यंत पोहोचत आहे. निवडणूक प्रक्रियेत प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी मतदारांना आपला प्रभाग, मतदान केंद्र आणि यादीतील अनुक्रमांक शोधण्यासाठी भटकंती करावी लागू नये, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. 'प्रत्येक मतदाराने आपली मतदार चिठ्ठी आवर्जून स्वीकारून ती जपून ठेवावी,' असे आवाहन मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांनी केले आहे.शहरातील विविध चौकांत आणि प्रभागांत बॅनर, पोस्टर्स आणि सोशल मीडियाच्या माध्यमातूनही मतदारांमध्ये उत्साह निर्माण करण्याचे प्रयत्न मनपा प्रशासनाकडून केले जात आहेत. १५ जानेवारी रोजी होणाऱ्या मतदानासाठी आता प्रशासन आणि नागरिक दोघेही सज्ज असल्याचे चित्र अकोल्यात दिसत आहे.

# अकोल्यात भाजपचे 'शक्तिप्रदर्शन'; पालकमंत्री आकाश फुंडकरांचा झंझावाती दौरा

प्रतिनिधी १२ जानेवारी

**अकोला:** महानगरपालिकेच्या निवडणुकीचे बिगुल वाजताच भारतीय जनता पक्षाने प्रचाराचा गिअर वाढवला आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री तथा आकाश फुंडकर सोमवारी शहरातील विविध प्रभागांत झंझावाती दौरा करणार असून, नागरिकांशी थेट संवाद साधत निवडणूक प्रचाराला धार देणार आहेत. संवाद सभा मुळे महापालिकेत भाजप सत्तेचे दारे उघडणार आहे.

भाजप - राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी पालकमंत्री फुंडकर प्रभाग क्रमांक ३, ४, ८, ९, १०, १४, १५, १९ आणि २० मध्ये भेटी देत मतदारांशी थेट संवाद साधणार आहेत. उमरी येथील सुरुची हॉटेल परिसरात नागरिकांशी संवाद, तर



डाबकी रोडवरील प्रभाग ८ मधील राजकमल हॉटेल समोर, पालखी मार्गावर जाहीर सभा हे या दौऱ्याचे प्रमुख आकर्षण असणार आहे. गेल्या काही वर्षांत अकोल्यात झालेली विकासकामे, तसेच आगामी काळातील विकासाचा आराखडा मांडत 'अकोल्याचा विकास हाच आमचा ध्यास' या भूमिकेतून पालकमंत्री विरोधकांवर जोरदार टीका करण्याची शक्यता आहे.महापालिकेतील भाजपची कामगिरी आणि भविष्यातील संकल्प यावर ते काय भूमिका मांडतात, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. भाजपच्या या आक्रमक प्रचारामुळे निवडणूक रिंगणातील इतर पक्षांमध्ये हालचाली वाढल्या असून, पालकमंत्र्यांच्या संवाद सभांना मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भाजप कार्यकर्त्यांनी केले आहे. देशात आणि राज्यातील सत्तेची मोठी मदत अकोल्यात महापालिका भाजपची सत्ता स्थापन झाल्यावर होणार आहे.

# प्रभाग क्रमांक १२ मध्ये मनन शाह यांच्या नावाची चर्चा

प्रतिनिधी १२ जानेवारी

## ◆ बॅट निवडणूक चिन्हावर ते निवडणूक लढवत आहेत



**अकोला:** ही महापालिका निवडणुकीत जे प्रभावित करणारे उमेदवार आहेत त्या मध्ये मनन योगेश शाह यांचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. त्यांनी प्रचाराचा धडाका लावलेला दिसत आहे. जनसेवेला प्राधान्य, विकास पर्वाचा आरंभ या टॅग लाईन सह प्रभाग पिंजून काढला जातो आहे.

मनन शाह यांची विकासाची संकल्पना स्पष्ट असल्याचे त्यांच्या बोलण्यातून जाणवते. अपक्ष उमेदवार म्हणून त्यांनी प्रभाग क्रमांक १२ मध्ये चांगले वातावरण तयार केले आहे. मनन योगेश शाह नगरसेवक पदाचे अधिकृत उमेदवार 'बॅट' या चिन्हा समोरील बटन दाबून प्रचंड बहुमतांनी विजयी करा असे आवाहन करण्यात येत आहे. युवक तसेच समाजातील सर्व स्तरातून मनन शाह यांना चांगला पाठिंबा मिळत आहे. आपल्याला संधी मिळाली तर प्रभागाचा कायापालट करू असा विश्वास ते व्यक्त करतात.

# बालपणीचे खेळ एक आगळा वेगळा पतंग महोत्सव

प्रतिनिधी १२ जानेवारी




**अकोला:** लहान मुलांना आपल्या संस्कृतीशी जोडून ठेऊन त्यांना त्याचे महत्व आणि त्यातून त्यांना आनंद मिळावा ह्या उद्देशाने विदर्भातील पहिली लहान मुलांची लायब्ररी पीएसवी नर्चरी आदर्श कॉलनी अकोला ह्यांचा दरवर्षी साजरा होणारा पतंग महोत्स्तव रविवार ११ जानेवारी रोजी त्यांच्या लाइब्रेरी समोरील आदर्श कॉलनी क्रीडांगणात मोठ्या उत्साहाने पार पडला.

अकोल्यातील बालगोपाल तसेच त्यांच्या पालकांना वर्षाच्या सुरुवातीला येणाऱ्या संक्रांत पर्वाचा आपल्या लहानग्यांबरोबर मनसोक्त आनंद घेता यावा म्हणून हा उपक्रम दरवर्षी संचालिका डॉ. प्रिया संकेत वखारिया आणि रेवती सतीश ढोरे ह्या घेतात.

मुलांना आनंदा बरोबर पर्यावरण संवर्धनाचे महत्व देखील त्या सांगतात. त्याकरिता प्लास्टिक आणि नायलॉन चा वापर न करता साध्या धाग्याचा वापर करा हे सांगितले. आणि त्यांना तिथे देण्यात ही आले. किमान २५० ते ३०० लोकांचा सहभाग ह्या कार्यक्रमात होता.

ह्या आनंदात सहभागी होण्या करिता अस्तित्व फाउंडेशन च्या गरजवंत मुलांना विशेष निमंत्रण देण्यात आले होते अस्तित्व च्या संचालिका गुंजन आणि गौरव ह्यांनी ते स्वीकारत मुलांसोबत मनसोक्त आनंद घेतला. वेगवेगळे खेळांचे विभाग क्रीडांगणात तयार केले होते त्यामधे जुन्या आठवणींना उजाळा देत कंचे, डिग्गर, लगोरी, रस्सी खेच, चाक हाताने फिरवने अश्या जुन्या खेळांना प्रोत्साहन देण्यात आले. लहान मुले व पालक वर्गांकरिता आकर्षण म्हणून विविध प्रकारचे खाण्याचे तसेच खारीदारी करिता स्टॉल लावण्यात आले होते. लहान मुलांनी पतंग उडविण्याबरोबर च नृत्य आणि खेळाच्या आनंदाची संक्रांत साजरी केली. ह्या उपक्रमा करिता डॉ. संकेत वखारिया वसुधा हॉस्पिटल तसेच होटल राइजिंग सनचे संस्थापक मनोज आणि केतन शाह ह्यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन भाविनी शाह यांनी केले.

# सैयद मोहसीन उर्दु हायस्कुलचा रेखाकला एलीमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षेचा निकाल १०० टक्के

प्रतिनिधी १२ जानेवारी



**अकोला:** यंग मुस्लिम एज्युकेशन ॲंड सोशल वेल फेअर सोसायटी पातुर व्दारा संचालीत सैयद मोहसीन उर्दु हायस्कुल शिवणी येथून शासकीय रेखाकला एलीमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला.

शाळेची निकालाची परंपरा कायम राखल्याने मुख्याध्यापक सैयद मोहीब इकबाल यांनी विद्यार्थ्यांचे अभिनदन केले. शाळेतील सहायक शिक्षक असीमउद्दीन यांनी एलिमेंट्री व इंटरमीडिएट चित्रकला परीक्षा यांचे महत्त्व सांगितले.

फाईन आर्ट्स, एनिमेशन, ग्राफिक डिझाईन, फॅशन डिझाईन अशा अभ्यासक्रमांसाठी चांगला पाया तयार होतो. एलिमेंट्री व इंटरमीडिएट चित्रकला परीक्षा या विद्यार्थ्यांच्या कलेचा विकास, प्रमाणपत्राद्वारे मूल्यवर्धन आणि भविष्यातील शिक्षण व करिअरसाठी फायदा करून देतात.

या निकालात अलीजा परवीन अफरोजखान, जवेरीया फीरदोस शेख मतीन, मोहम्मद अयान मोहम्मद वसीम, मुनवीर हुसेन नाजीर हुसेन, सैयद अबुतलहा जाहीद अली, जोया फातेमा सैयद एजाज, आलया सदफ सैयद आसीफ, अदनान अहेमद नियाज अहेमद, अलफीया अंजुम मोहम्मद शारीक, अलफीया नाज शेख अनीस, अलविना परवीन अहेमद खान, अशमीरा अनम कौसर अली, कलीमुन्नीसा इफतेखार अहेमद, कायनात बानो शेख सिराज, महेचरश फीरदोस शेख असलम, नाजीया परवीन शेख एजाज, सादीया परवीन शेख इरफान, सानीसा परवीन आरीफ खान, सायका अनम युनुस खान, सुमयया परवीन नइम खान यांनी यश मिळवले. सहायक शिक्षक शमशेर खान, मोहम्मद अनवारोद्दीन, मोह्मद जाहिद व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

**जाहीर नोटीस विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी. क्र. ३७७/२०२५** **चौकशी तारीख: २२/०१/२०२६**

**अर्जदार**

**१. श्रीमती दिपीका दिलीप कुळकर्णी, वय ५०, धंदा:घरकाम**
**२. प्रसाद दिलीप कुळकर्णी, वय २४, धंदा: शेती**
**अर्जदार क्र.१ व २.रा.तरोडा पो. कावसा, ता. आकोट जि. आकोला**
**३. सौ. पूजा गौरव जोशी, वय २७, धंदा: घरकाम**
**रा. पाचन वडगाव, ता. जि. अकोट**

**.... विरूद्ध ....**

**गैरअर्जदार: कोणीही नाही**

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेगुलेशन VIII १८२७ चे कलम २ अंतर्गत वि. दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर), अकोट, जिल्हा अकोला याचे न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज सादर केला आहे.

अर्जदार हे वरील ठिकाणचे रहिवासी असुन अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ व ३ चे वडील नामे दिलीप सदाशिव कुळकर्णी हे त्यांचे संपुर्ण जिवनकाळात मौजे तरोडा पो. कावसा ता. आकोट जि. आकोला येथे राहले व तेथेच दि. २९/०६/२०२५ येथे मयत झाले आहेत. तसेच मयत दिलीप सदाशिव कुळकर्णी यांची आई नामे श्रीमती प्रभावती सदाशिव कुळकर्णी ह्या दि.०४/०७/२०१८ रोजी मौजे तरोडा ता. आकोट जि. आकोला येथे मयत झाले आहेत. मयत दिलीप सदाशिव कुळकर्णी यांना अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या व्यतिरीक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाही.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जासंबंधी इतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास किंवा ते स्वतः वारस असल्यास, सदरची नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन ३० दिवसाचे आंत, त्यांनी उपरोक्त न्यायायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहावे अन्यथा सदरचे प्रकरण नियमानुसार निकाली काढण्यात येईल.

करीता आज दिनांक २२/१२/२०२५ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

**सहायक अधिक्षक (न्यायीक)**
**दिवाणी न्यायालय (व.स्तर), अकोट,**
**जि. अकोला.**

# संक्रांती निमित्त तिळ गुळाला वाढती मागणी



प्रतिनिधी १२ जानेवारी

**हिवरखेड:** मकर संक्रांतीच्या निमित्ताने बाजारात तिळ गुळ मोठ्या प्रमाणात विक्रीला आले आहे. याच्यासह लाडक्या बहिणीचे आवडत्या वस्तू सुद्धा विक्रीला आल्या. मकरसंक्रांतीच्या पाच दिवसात महिला मंडळ मध्ये उखाणे घेऊन संक्रांत भेट वस्तु देण्याची पद्धत आपल्या भागात असल्याने याकरिता लागणाऱ्या अधिक वस्तू हिवरखेड आठवडी बाजारात पाहण्यास मिळत आहेत. पसंती वस्तू खरेदी करण्यासाठी लाडक्या बहिणींनिनची गर्दी सुद्धा दिसून येत आहे. बाजारात तिळ गुळ तसेच वाणाच्या विविध वस्तू बाजारात उपलब्ध झाल्या आहेत. त्याला वाढती मागणी आहे.

# शहापूर रूपागड श्री देवी मोती माता यात्रा व कबड्डी स्पर्धा संपन्न

प्रतिनिधी १२ जानेवारी



**अकोट:** शहापूर रूपागड आदिवासी बहुल भिल समाजाचे गाव कित्येक वर्षाची परंपरा जोपासत ग्राम कुलदैवत श्री देवी मोती माता आहे. मंदिर परिसरात महाकाय महादेव त्रिशूल, शिवलिंग पिंड व नंदी बाजूला वीर एकलव्य यांची मोठी मूर्ती आजही साक्ष देत आहे.

देवी मोती माता यात्रा महोत्सव पौष पौर्णिमेला होत असून गावात ग्राम स्वच्छता, घरासमोर रांगोळ्या, फुले व गुलालाची उधळण करीत ढोल नगाऱ्यांच्या व आदिवासी नृत्यात वाजत गाजत पालखी मिरवणूक गावांमधून निघाली. पालखीमध्ये सर्व गावकरी महिला पुरुष मानाची आरती व नारळ फोडतात. आरतीमधील पेढा गूळ व अंगाऱ्याला आदिवासी बांधव महत्त्व देतात. यात्रेमध्ये किंवा नवरात्र उत्सवात मोठ्या तराजू मध्ये एका बाजूने गुळांच्या भेल्या तर दुसऱ्या बाजूने बरा झालेला रुग्ण त्यांच्या भारोभार तुला करून महाप्रसाद वाटपाची प्रथा आजही पार पाडल्या जाते. यात्रेला दिवाळी समजून येतात मोती माता मंदिरात नवरात्र उत्सव भावभक्तीने साजरा होतो. उत्सवामध्ये विविध सांप्रदायिक आदिवासी कला नृत्याचे कबड्डी स्पर्धा विविध जनजागृती कार्यक्रमाचे पथनाट्याचे आयोजन केले जाते. कबड्डीचे प्रथम बक्षीस २१००० रुपये पोपटखेड संघाला, द्वितीय बक्षीस १५००० रुपये दर्यापूर संघाला तर तृतीय बक्षीस १०००० हजार रुपये मक्रमंपुर संघाला तर चौथे बक्षीस ७००० हजार शिवपूर संघाला, राम मंगळे यांच्याकडून ट्रॉफी व कीड भेट देण्यात आली व ढोल भजनी मंडळाचे सरपंच यांच्याकडून शाल दुपट्टा व नारळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी सरपंच व सरपंचपती विनायक सुरत्ने ,उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य, एकलव्य क्रीडा मंडळ सर्व सदस्य यांच्या उपस्थितीत बक्षीस वितरण करण्यात आले.



सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

सोमवार, दि. १२ जानेवारी २०२६

https://epaper.citynewssuperfast.com


## जुन्या वादातून धारदार शस्त्राने हल्ला; भारी परिसरात एक जखमी

प्रतिनिधी १२ जानेवारी

**यवतमाळ** : जुन्या वादातून एका व्यक्तीवर धारदार शस्त्राने हल्ला केल्याची धक्कादायक घटना यवतमाळ शहरातील भारी परिसरात १० जानेवारी २०२६ रोजी सकाळच्या सुमारास घडली. या घटनेप्रकरणी यवतमाळ शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रामभाऊ हिरामण तोडासे (वय ५५, रा. रामराव पोस्ट, येळाबारा, ता. पांढरकवडा; सध्या रा. भारी, यवतमाळ) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, सकाळी सुमारे ९.३० वाजता आरोपी ज्ञानेश्वर देवराव धानोरकर (वय ५९, रा. भारी, यवतमाळ) यांनी जुन्या वादाचा राग मनात धरून तोडासे यांच्या हातातील कातडी कापण्याच्या पट्याने कमरेच्या मागील बाजूस वार केला. या हल्ल्यात रामभाऊ तोडासे जखमी झाले. आरोपीने शिवीगाळ करत जिवे मारण्याची धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी अप.क्र. १२/२६ नुसार भारतीय दंड संहितेच्या कलम ११८(१), ३५२, ३५१(२)(३) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

# राज्यात सिकलसेलचे 12,420 रुग्ण, 1.24 लाख वाहक

## सिकलसेल मुक्तीसाठी 'अरुणोदय' अभियान; १५ जानेवारीपासून २१ जिल्ह्यांत विशेष तपासणी मोहीम

प्रतिनिधी १२ जानेवारी

राहुल वासनिक

**यवतमाळ** : महाराष्ट्रात सिकलसेल या अनुवंशिक आजाराचे वाढते प्रमाण चिंताजनक ठरत असून, गेल्या काही वर्षांत सिकलसेल रुग्ण व वाहकांची संख्या लक्षणीयरीत्या वाढली आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माहितीनुसार सन 2019 ते 31 ऑक्टोबर 2025 या कालावधीत राज्यात 1 कोटी 5 लाख 86 हजार 733 नागरिकांची सिकलसेल तपासणी करण्यात आली. या तपासण्यांमध्ये 12,420 सिकलसेल रुग्ण (SS) व 1,24,275 सिकलसेल वाहक (AS) आढळून आले आहेत.



सिकलसेल आजाराचे प्रमाण प्रामुख्याने आदिवासी व दुर्गम भागात अधिक असल्याचे चित्र आहे. ठाणे, नाशिक, नंदुरबार, अमरावती, गोंदिया, गडचिरोली, पालघर, नागपूर, वर्धा, चंद्रपूर, भंडारा, यवतमाळ, धुळे, जळगाव, बुलढाणा, नांदेड, वाशिम, अकोला, छत्रपती संभाजीनगर, रायगड व हिंगोली या 21 जिल्ह्यांमध्ये सिकलसेल आजाराचे प्रमाण तुलनेने अधिक आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने सिकलसेल नियंत्रण कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यावर भर दिला आहे.

सिकलसेल हा रक्तपेशींशी संबंधित अनुवंशिक आजार असून तो आई-वडिलांकडून अपत्यांना होतो. या आजारात लाल रक्तपेशी विळ्याच्या आकाराच्या व कठीण होतात. त्यामुळे रक्तवाहिन्यांमध्ये अडथळे निर्माण होऊन तीव्र वेदना, अशक्तपणा, सांधेदुखी, रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी होणे, तसेच फुफ्फुस, यकृत, प्लीहा व मेंदूसारख्या महत्त्वाच्या अवयवांवर गंभीर परिणाम होतो. वेळेवर उपचार न मिळाल्यास हा आजार जीवघेणाही ठरू शकतो.

### सिकलसेल मुक्तीसाठी 'अरुणोदय' अभियान

▪ राज्यातील २१ जिल्ह्यांमध्ये सिकलसेल आजार पूर्णपणे नियंत्रित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने 'अरुणोदय' नावाची विशेष मोहीम जाहीर केली आहे. येत्या १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत या मोहिमेअंतर्गत एकही नागरिक तपासणीपासून वंचित राहणार नाही, असे नियोजन सार्वजनिक आरोग्य विभागाने केले आहे.

### आरोग्य विषयक माहितीसाठी हेल्पलाईन

▪ राज्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी जवळच्या शासकीय आरोग्य केंद्रात सिकलसेल तपासणी करून घ्यावी, तसेच आरोग्यविषयक माहितीसाठी 104 हेल्पलाईन किंवा आशा स्वयंसेविकांशी संपर्क साधावा, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य विभागाने केले आहे.

राज्यात सिकलसेल नियंत्रण कार्यक्रम सन 2008 पासून राबविण्यात येत असून, या कार्यक्रमांतर्गत नागरिकांना मोफत सोल्युबिलिटी चाचणी, इलेक्ट्रोफोरेसिस व एचपीएलसी तपासणी, रुग्णांना मोफत औषधे, फॉलिक ॲसिड गोळ्या, नियमित आरोग्य तपासणी, गरजेनुसार रक्त संक्रमण, तसेच टेलिमेडिसिनद्वारे तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला देण्यात येतो. याशिवाय रुग्ण व त्यांच्या कुटुंबीयांमध्ये जनजागृती करण्यावरही भर देण्यात येत आहे.

सिकलसेल आजार पूर्णपणे बरा होत नसला तरी योग्य औषधोपचार, नियमित तपासणी, समतोल आहार व काळजी घेतल्यास हा आजार नियंत्रणात ठेवता येतो, असे आरोग्य तज्ज्ञांचे मत आहे. विवाहापूर्वी सिकलसेल तपासणी करणे, सिकलसेल रुग्ण व वाहकांनी परस्पर विवाह टाळणे व गर्भधारणेनंतर वेळेत तपासण्या करणे हे प्रतिबंधासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे. सिकलसेलग्रस्त रुग्णांना शासनामार्फत विविध लाभही देण्यात येतात. एसएस पॅटर्नच्या रुग्णांना संजय गांधी निराधार योजना अंतर्गत आर्थिक सहाय्य, विद्यार्थ्यांना परीक्षेदरम्यान अतिरिक्त वेळ, तसेच उपचारासाठी बस प्रवासात सवलत दिली जाते. शासनाच्या या प्रयत्नांमुळे सिकलसेल रुग्णांचे आयुष्यमान सुधारण्यास मदत होत आहे.

## एकाच रस्त्यासाठी दोनदा पैसाचा चुराडा

### नगरपरिषद, PWD व जीवन प्राधिकरणात समन्वय अभाव

प्रतिनिधी १२ जानेवारी

**यवतमाळ** : शहरात प्रगतीचे नारे दिले जात आहेत, पण प्रत्यक्षात नागरिकांच्या रस्त्यांवर प्रशासनाने अक्षरशः 'फावडा फोडला' आहे. दर्डा नगर परिसरातील रस्त्याचे प्रकरण प्रशासनातील समन्वयअभावाचे जिवंत उदाहरण ठरले आहे. सन २०१७ मध्ये नगरपरिषद वसार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) यांनी कोट्यवधी रुपये खर्च करून बांधलेला मजबूत सिमेंट रस्ता आता जीवन प्राधिकरणाच्या भूमिगत गटार योजनेसाठी पुन्हा खोदण्यात आला आहे. हे पाहून नागरिकांना संताप होतो की एकाच रस्त्यासाठी दोनदा पैसा वाया गेला आहे. या



प्रकरणातील गंभीर बाब म्हणजे, रस्ता बांधण्यापूर्वीच नियोजन समितीच्या बैठकीत भविष्यातील गटार पाईपसाठी सूचना दिल्या होत्या. मात्र नगरपरिषद, PWD आणि जीवन प्राधिकरण यांच्यात आवश्यक समन्वय न झाल्यामुळे काम पुर्ण करण्याऐवजी तोच रस्ता फोडण्यात आला. "निविदा मागविल्या नाहीत" किंवा "अधिकाऱ्यांच्या गलतीमुळे काम वेळेवर झाले नाही" असे छोटे-मोठे कारणे सुद्धा पुढे केली जात आहेत, पण नागरिकांचा त्रास कायम आहे.

सध्या परिस्थिती अशी आहे की खोदलेल्या रस्त्यांवर भराव निकृष्ट झाला आहे, ठिकठिकाणी खड्डे, उडणारी धूळ आणि अपघाताचा धोका वाढला आहे. वाहनचालक, पादचारी तसेच स्थानिक रहिवासी प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे त्रस्त झाले आहेत. नागरिक म्हणतात की विकासाच्या नावाखाली हा प्रकार सहन करणे अशक्य आहे. विशेष म्हणजे, नगरपरिषद, PWD आणि जीवन प्राधिकरण या तीन वेगवेगळ्या यंत्रणांकडे जबाबदाऱ्या असूनही कोणताही एकत्रित आराखडा नाही. परिणामी आधी रस्ता बांधणे आणि नंतर तोच रस्ता फोडणे, हेच शहरात 'विकास' म्हणून घडत आहे. या कारणास्तव जनतेचा पैसा वाया जातो आणि नागरिकांचा संताप वाढतो आहे. स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे की तिन्ही विभागांनी परस्पर दोषारोप न करता तातडीने दर्जेदार पुनर्बांधणी करावी. अन्यथा, वाढता रोष रस्त्यावर उतरू शकतो. शहरातील विकास फाईलींच्या पातळीवर मर्यादित राहिलाच नाही, तर नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. यवतमाळमधील या प्रकरणातून शहरातील प्रशासनातील समन्वयअभावाचे गंभीर परिणाम स्पष्ट दिसून येत आहेत. विकासाच्या नावाखाली पैसे वाया घालणे, रस्त्यांची दुर्दशा, अपघाताचा धोका हे सगळे प्रश्न नागरिकांसमोर उभे आहेत.

## मकरसंक्रांतीत 'मांजा'चा धोका !; कारवाईसाठी पोलिस 'ऑन फील्ड'

प्रतिनिधी १२ जानेवारी

**यवतमाळ** : मकरसंक्रांतीच्या सणात पतंग उडवण्याचा उत्साह प्रत्येकाच्यात असतो, पण काही लोक नागरिकांच्या सुरक्षेस धोकादायक प्रतिबंधित मांजा, विशेषतः चायनिज मांजा वापरत आहेत. शहर पोलीस स्टेशनने यावर्षी ऑन फील्ड उपाययोजना सुरू केल्या आहेत. नियम मोडणाऱ्यांवर पोलिस कारवाई करतील.

प्रतिबंधित मांजा दुचाकी चालकांसाठी प्राणघातक ठरू शकतात, कारण मांजाचा धागा हवा, जाळी किंवा विद्युत दारांशी येऊन अपघात घडवू शकतो. पी आय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय सपकाळ जमदार, सुरेश राठोड, पीसी प्रतीक नेवारे व प्रदीप कुराडकर यांनी सक्रिय सहभाग घेतला आहे. पालकांनी आपल्या मुलांना प्रतिबंधित मांजा वापरण्यापासून रोखणे गरजेचे असल्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.



सतत फील्डमध्ये उपस्थित पोलिसांमुळे नागरिकांमध्ये जागरूकता वाढत आहे, आणि सुरक्षिततेचे नियम पाळूनच सण साजरा करावा, असे सांगितले आहे. यवतमाळ पोलिसांचे म्हणणे आहे, "सुरक्षिततेसाठी नियम पाळा, फक्त आनंदासाठी पतंग उडवा."

## ढाणकीला तालुका नव्हे, 'अप्पर तहसील'चा दर्जा

### निर्णयाला ढाणकीकरांचा तीव्र विरोध

प्रतिनिधी १२ जानेवारी

**ढाणकी** : ढाणकीला स्वतंत्र तालुक्याचा दर्जा मिळावा, अशी मागणी गेल्या तीन दशकांपासून सुरू आहे. मात्र राज्य शासनाने पुन्हा एकदा अप्पर तहसील कार्यालय सुरू करण्याचे निर्णय घेतले आहेत, ज्यामुळे परिसरात संमिश्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. स्थानिक आणि आंदोलक यांचे म्हणणे आहे की, "शासन दुधाची तहान ताकावर भागवत आहे," आणि स्वतंत्र तालुक्याच्या मागणीवर पाणबुडी मारण्याचा प्रयत्न केला जातो आहे.

ढाणकीच्या तालुक्याचा प्रश्न आजचा नव्हे. १९९५ पासून या मागणीसाठी संघर्ष सुरू आहे, तर १९९९ मध्ये आंदोलन रौद्र रूपात आले. त्या वेळी शहरात मोठा जाळपोळ व हिंसाचार झाला, प्रशासनाला दोन दिवस संचारबंदी लागू करावी लागली, शेकडो तरुणांवर गुन्हे दाखल झाले, अनेकांना अमरावती कारागृहात ठेवावे लागले, तर काहींना अनेक वर्षे न्यायालयाच्या पायऱ्या झिजवाव्या लागल्या.

मध्यंतरी केवळ दोन दिवस 'नायब तहसील' सुरू केले गेले, पण काही दिवसांत बंद पडले. आता निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर 'अप्पर तहसील'साठी प्रशासकीय हालचाली सुरू झाल्याचे पत्र आले आहे. मात्र आंदोलकांचे म्हणणे आहे की, मूळ मागणी स्वतंत्र तालुक्याची असून, केवळ उप-कार्यालय देऊन जनतेच्या तोंडाला पाने पुसली जात आहे.

स्थानिकांचे म्हणणे आहे की, "वाढती लोकसंख्या आणि विस्तार लक्षात घेता शासनाने ग्रामपंचायतीची नगरपंचायत केली, मग तालुका करण्यास काय अडचण आहे?" अप्पर तहसीलमुळे काही प्रशासकीय कामे सोपी होतील, पण पंचायत समिती, कृषी उत्पन्न बाजार समिती आणि महसूल विभागासाठी ढाणकीला पूर्णवेळ तालुक्याचा दर्जा मिळणे अनिवार्य आहे.

"आम्ही तालुक्यासाठी रक्त सांडले, गुन्हे अंगावर घेतले. प्रशासनाने दिलेले हे 'अप्पर तहसील' म्हणजे आमच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे. आम्हाला तालुकाच हवा!" ढाणकीकरांचा संघर्ष अजूनही सुरू असून, स्वतंत्र तालुक्याची मागणी प्रशासनाकडे ठामपणे मांडली जात आहे अशी प्रतिक्रीया स्थानिक आंदोलकानी दिली.

## फुबगाव झोपडपट्टी दिड महिन्यापासून अंधारात

### ग्रामपंचायत निष्क्रियतेमुळे नागरिक संतप्त; उपाययोजना न केल्यास आंदोलनाचा इशारा

> ▪ अंधारामुळे साप, विंचू आणि रानटी प्राणी तसेच असामाजिक घटकांचा धोका वाढला असून अपघातांची शक्यता निर्माण झाली आहे. नागरिकांनी या समस्येबाबत वारंवार ग्रामपंचायत प्रशासनाकडे तक्रारी केल्या, तरी अद्याप एकही दिवा बसवण्यात आलेला नाही.

प्रतिनिधी १२ जानेवारी

**दारव्हा** : तालुक्यातील फुबगाव येथील झोपडपट्टीत राहणाऱ्या गोरगरीब नागरिकांना दीड महिन्यांपासून अंधारात जीवन जगावे लागत आहे. या परिसरातील सार्वजनिक ठिकाणी तसेच घरांकडे जाणाऱ्या रस्त्यावर तीन विद्युत दिवे पूर्णपणे बंद आहेत. त्यामुळे रात्री महिला, वृद्ध आणि लहान मुलांसह कामावरून परतणाऱ्या मजुरांना मोठ्या धोक्याचा सामना करावा लागत आहे.

दारव्हा तालुका युवक काँग्रेसचे अध्यक्ष अतुल राऊत म्हणाले, "गेल्या दीड महिन्यांपासून फुबगाव झोपडपट्टीतील गोरगरीब जनता अंधारात राहते, तरी ग्रामपंचायत अजूनही निष्क्रिय आहे.

महिलांची सुरक्षितता धोक्यात आली आहे. तात्काळ दिवे बसवले नाही तर आम्ही आंदोलन करू." झोपडपट्टीतील नागरिकांनी प्रशासनाला इशारा दिला आहे की, जर वेळेत उपाययोजना झाली नाही तर आंदोलनास भाग पडावे लागेल. नागरिकांची मागणी आहे की, परिसरात त्वरित विद्युत दिवे बसवून सुरक्षितता सुनिश्चित करावी.



गावकऱ्यांच्या भावना लक्षात घेता, फुबगाव झोपडपट्टीतील या अंधकार समस्येवर प्रशासनाची तातडीने कृती अपेक्षित आहे.

## निर्मला कळसकर यांचे निधन



प्रतिनिधी १२ जानेवारी

**यवतमाळ** : शहरातील कृषीनगर, आर्णी रोड येथील रहिवासी निर्मला भाऊराव कळसकर (वय ७४) यांचे सोमवारी रात्री १ वाजताच्या सुमारास दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्या पश्चात पती भाऊराव कळसकर, मुलगा संतोष, दोन मुली मनीषा व ॲड. मंजुषा तसेच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी दुपारी २ वाजता वडगाव, आर्णी रोड येथील मोक्षधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## महात्मा फुलेंचा सत्यशोधक वारसा भाऊसाहेबांनी पुढे नेला

### हनुमंत गायकवाड यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी १२ जानेवारी

**उमरखेड** : महात्मा फुले यांनी सुरू केलेल्या सत्यशोधक चळवळीचा विचार व वारसा माजी आमदार स्व. भाऊसाहेब माने यांनी आयुष्यभर जपला व पुढे नेला. समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करणे हा त्या विचारांचा पुढचा टप्पा आहे, असे त्यांनी प्रतिपादन उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंतराव गायकवाड यांनी केले.

महात्मा ज्योतिबा फुले स्मृतिदिनानिमित्त भाऊसाहेब माने गौरव कृती समितीच्या वतीने उमरखेड येथील जिजाऊ भवनात सत्यशोधक भाऊसाहेब माने समाजभूषण पुरस्कार वितरण समारंभ पार पडला या प्रसंगी ते बोलत होते.

समारंभाचे अध्यक्ष सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. वि. ना. कदम होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी सांगितले की, स्वतःपासून व आपल्या गावापासून प्रामाणिक कार्य सुरू करणे महत्त्वाचे असून सततच्या प्रयत्नातून समाजाकडून मिळणारा सन्मान म्हणजेच गौरव पुरस्कार. यावेळी सहा व्यक्ती आणि दोन सेवाभावी संस्थांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये सतीश मुडे क्रीडा क्षेत्र, संभाजी भोयर पत्रकारिता, प्रशांत माणिकराव सराफ दिव्यांग उद्योजक, नागेश मिराशे जिल्हा परिषद शाळा, विठ्ठल (शिक्षण), रविता लकडे महिला सक्षमीकरण, सुशील मुधळे रेशीम शेती (शेतकरी), नैसर्गिक पर्यावरण संवर्धन संस्था सेवाभावी संस्था, माणुसकीची भिंत सोशल फाउंडेशन, पुसद सेवाभावी संस्था यांचा समावेश आहे. समारंभाच्या प्रमुख पाहुण्यांमध्ये उमरखेडचे ठाणेदार शंकरराव पांचाळ, शिवाजीराव देशमुख सवनेकर, श्रीराम पाटील नलावडे, अजय माहेश्वरी, डॉ. अमोल देशमुख, नगरसेवक साजीद जहागीरदार, हनुमान पिलवंड, अशोक वानखेडे, निलेश जैन, गजानन रासकर, रवि शिलार, आनंद शिंदे, विश्वंभर वानखेडे, आकाश माने यांचा समावेश होता. कार्यक्रमास मोठ्या संख्येने महिला आणि नागरिक उपस्थित होते. सूत्रसंचालन सुनील वानखेडे, प्रास्ताविक सुधाकर वानखेडे, तर आभार प्रदर्शन बालाजी वानखेडे यांनी केले.




## प्रा.अश्विन जाधव यांचा गौरव

प्रतिनिधी १२ जानेवारी

**उमरखेड** : पत्रकार दिनाच्या औचित्याने दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघ, नाशिक यांच्या वतीने प्रा. अश्विन नारायण जाधव यांचा इंटरनॅशनल अचिव्हर्स अवॉर्ड २०२६ ने गौरव करण्यात आला. हा पुरस्कार शिर्डी येथील साईबाबांच्या पावन भूमीत भव्य सोहळ्याच्या माध्यमातून प्रदान करण्यात आला.

पुरस्कार सोहळ्यास शिर्डी साईबाबा संस्थानचे कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, जिल्हा माहिती अधिकारी सुरेश पाटील (शिर्डी), उद्योग समूहाचे राजेश मालपाणी, दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. महेंद्र देशपांडे, शिर्डी नगराध्यक्षा जयश्री थोरात, अभिनेत्री प्रिया चौधरी उपस्थित होते.



प्रा. जाधव सध्या मातोश्री उच्च माध्यमिक विद्यालय, महागाव येथे कार्यरत असून गेल्या १५ वर्षांपासून शिक्षण क्षेत्रात प्रामाणिक सेवा देत आहेत. त्यांनी विद्यार्थ्यांचा बौद्धिक, नैतिक व सामाजिक विकास व्हावा यासाठी सातत्याने शैक्षणिक उपक्रम राबवले आहेत.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

सोमवार दि. १२ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

व्हा दक्ष, घ्या लक्ष
वाचवा वृक्ष...




# वृक्ष वाचवा, वृक्ष जगवा हो
# वृक्षतोड करू नका हो...!

## 'इको ग्लोबल वेलफेअर'च्या वतीने सागर कोकास यांचा आर्त टाहो

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

एकीकडे वृक्षरोपणाच्या नावाखाली वृक्षारोपण केले जात नाही. तर दुसरीकडे विकासाच्या नावाखाली वृक्ष तोडल्या जात आहे. त्यामुळे पर्यावरणाची हानी होत आहे. वाशीम शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६१ च्या दुतर्फा उभे असलेले जुने, भव्य आणि वारसारूप वृक्ष वाचवण्यासाठी शहरातील नागरिक आणि पर्यावरणप्रेमी संघटना 'इको ग्लोबल वेलफेअर' एकत्र आले असून, विकासासोबत पर्यावरण संरक्षणाचा सकारात्मक आणि जबाबदार संदेश दिला जात आहे. यासाठी सागर कोकास यांनी पुढाकार घेतला असून वृक्ष वाचविण्यासाठी व वृक्ष जगविण्यासाठी व शहराच्या विकासासाठी, स्वच्छ शहर ग्रीन शहर यासाठी एकत्र येण्याचे आवाहन केले आहे.

महामार्गाच्या कामाच्या अनुषंगाने प्रस्तावित वृक्षतोडीबाबत नागरिकांमध्ये निर्माण झालेल्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर, इको ग्लोबल वेलफेअरने प्रशासनाशी संवाद साधत पर्यावरणपूरक विकासाचा मार्ग अवलंबावा, अशी विनंती केली आहे. संघटनेचे स्थापक स्वप्निल गव्हाळे आणि सह-स्थापक सागर कोकस यांनी या विषयावर समतोल आणि अभ्यासपूर्ण भूमिका मांडली आहे.



संघटनेने स्पष्ट केले आहे की, हे वृक्ष वाशिमच्या पर्यावरणीय समतोलाचे रक्षक असून, प्रदूषण नियंत्रण, तापमान संतुलन आणि शहराच्या सौंदर्यात मोलाची भर घालतात. यासोबतच, हे वृक्ष पक्षी, कीटक व स्थानिक जैवविविधतेसाठी सुरक्षित आश्रयस्थान ठरत आहेत. स्वप्निल गव्हाळे म्हणाले, 'विकास आवश्यक आहे, पण तो निसर्गाशी सुसंगत असला पाहिजे. पर्यायी रस्ते रचना, तांत्रिक बदल किंवा नियोजनपूर्वक वृक्ष प्रत्यारोपण करून विकास आणि पर्यावरण यांचा समतोल राखता येऊ शकतो.' सागर कोकस यांनी सांगितले, 'हे वृक्ष केवळ सावली देणारे नाहीत, तर वाशिमच्या ओळखीचा आणि वारशाचा भाग आहेत. नागरिकांच्या सहभागातून त्यांचे संरक्षण होणे ही शहरासाठी अभिमानाची बाब आहे.' दरम्यान, संघटनेच्या वतीने नागरिकांच्या सह्या व छायाचित्रांसह जनहित निवेदन तयार करण्यात आले असून, मोठ्या संख्येने वाशिमकरांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त पाठिंबा दिला आहे. हा उपक्रम प्रशासन आणि नागरिक यांच्यातील सकारात्मक संवादाचे उदाहरण ठरत आहे. हरित वाशिमकडे एक पाऊल इको ग्लोबल वेलफेअरच्या या पुढाकारामुळे वाशिममध्ये विकास आणि पर्यावरण संरक्षण एकत्र नांदू शकते, हा विश्वास अधिक बळकट होत आहे. नागरिकांचा सहभाग, प्रशासनाचा संवाद आणि संघटनांचा अभ्यासपूर्ण दृष्टिकोन यामुळे शहराच्या हरित भविष्यासाठी नवी दिशा मिळत आहे.

### शहराच्या विकासासाठी रस्त्यावर उतरणार -कोकास

शहरातील रस्ते १२ वर्षात पाच वेळा करूनही नागरिकांचे जीवन खड्ड्यातच गेले आहे. आता रस्ते विकासाच्या नावाखाली वृक्षतोड सुरू आहे. वृक्ष लावणे सोडा जगविणे ही होत नाही. त्यामुळे शहराच्या विकासासाठी व वृक्ष वाचविण्यासाठी पुढाकार घेणार असल्याचे सागर कोकास यांनी सांगितले.

## थोडक्यात

### श्री गोविंद विद्यालयामध्ये बालिका दिन



• सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर •

श्री. गोविंद विद्यालय, पार्डी (ताड) येथे दिनांक ३ जानेवारी रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून बालिका दिन मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी मुख्याध्यापक शामराव ठाकरे यांनी केले. वर्ग पाच ते सात मधून श्रुतलेखनमध्ये प्रथम क्रमांक कु. अनुष्का भगत वर्ग सहावा, द्वितीय क्रमांक प्रथमेश कातडे वर्ग पाचवा, श्रुतलेखन वर्ग आठ ते दहा मधून प्रथम क्रमांक शुभम लांभाडे वर्ग दहावा, द्वितीय क्रमांक कु. कार्तिकी जाधव वर्ग दहावा, तर वर्ग पाच ते सात वाचन स्पर्धेमधून प्रथम क्रमांक प्रथमेश कातडे वर्ग पाचवा, द्वितीय क्रमांक कु. अनुष्का भगत वर्ग सहावा, तसेच वर्ग आठ ते दहा मधून प्रथम क्रमांक पवन दहापुते वर्ग नववा, द्वितीय क्रमांक कु. अक्षरा पानभरे वर्ग आठवा, यांना प्राप्त झाला. ही स्पर्धा विद्यालयाचे मुख्याध्यापक शामराव ठाकरे यांच्या मार्गदर्शनात पार पडली. या स्पर्धेकरिता विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक बाळकृष्ण राऊत, व कु. मीना नानुटे परीक्षक म्हणून लाभले.

ही स्पर्धा यशस्वी करण्याकरिता विज्ञान शिक्षक जगदीश गावंडे, सदानंद ठाकरे, गोपाल गावंडे, आकाश ठाकरे, महादेव बोरकर, कनिष्ठ लिपिक अनेश मस्के यांनी अथक परिश्रम घेतले.

खुशखबर खुशखबर खुशखबर

हिंगोली रिंग रोड जवळ बायपासला लागून भुखंड प्लाट खरेदी करून घ्या अडीच लाख रुपयांमध्ये सहाशे स्केअर फुट प्लॅट, उपलब्ध आहे. तसेच तीस हजार रुपये टोकन देवून प्लाट बुकिंग करा, दोन हजार रुपये महिना देवून २० महिने भरावे लागेल. प्रत्येक तीन महिन्यानंतर तीस हजार रूपयाची खिस्त भरावी लागेल टोटल ३० हजाराच्या ६ खिस्ता आहे.

संपर्कः-प्रमोद सोनुने
प्लॉट बुकिंग चालू आहे.

मो. ७३५०६०५०२५, ९१३०९१८३११

## वाशिम नगरपरिषद निवडणूकीत भ्रष्टाचाराची आफत...
# कर्तव्य बजावलेल्या कर्मचाऱ्यांच्या मानधनात तफावत!

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

वाशिम नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ दरम्यान निवडणूक कर्तव्याकरिता राखीव ठेवण्यात आलेल्या व प्रत्यक्ष कर्तव्यावर पाठविण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या मानधन वाटपाबाबत काही प्रमाणात तफावत आढळून आल्याचे समोर आले आहे. पीआरओ कर्तव्याच्या कर्मचाऱ्यांचे मानधन अपात्र असल्याचे निवेदन मुख्याध्यापक रघुनाथ चौधरी यांनी निवडणूक अधिकाऱ्यांना दिले आहे.



निवडणूक कर्तव्य बजावलेल्या कर्मचाऱ्यांना सभा आणि निवडणुकीचे दिवस एकूण पाच दिवसांचे केंद्राध्यक्ष यांना २००० रु आणि मतदान अधिकारी १६०० रु वाटप करण्यात आल्याची माहिती असून, त्यानंतर करण्यात आलेल्या वाटपात मात्र केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी सर्वांना १६०० रक्कम देण्यात फरक दिसून आला आहे. प्रशासनाकडून काही कर्मचाऱ्यांचे मानधन त्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात काही कर्मचाऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा झाली नसल्याचे समजते. काही कर्मचाऱ्यांना थेट निरोप देऊन मानधन देण्यात आले, तर काही कर्मचाऱ्यांना याबाबत कोणताही फोन किंवा सूचना देण्यात आली नसल्याने संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकारामुळे निवडणूक कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत असून, सर्व कर्मचाऱ्यांना समान व पारदर्शक पद्धतीने मानधन देण्यात यावे, अशी मागणी होत आहे. संबंधित प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन मानधन वाटपातील तफावत दूर करावी व सर्व कर्मचाऱ्यांना योग्य ते मानधन लवकरात लवकर अदा करावे, अशी अपेक्षा कर्मचाऱ्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे. निवेदनानुसार अनेक कर्मचाऱ्यांना त्यांचे मानधन अपात्र असून काही कर्मचाऱ्यांना तुटपुंजे मानधन दिल्याचेही समोर आले आहे. या मानधनात काही निवडणुक अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार केल्याचे उघड होत आहे.

## संत झोलेबाबा मंदिरात स्काऊट गाईड सेवा प्रकल्प संपन्न

• सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर •

जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा पिंप्री खु. ता मंगरूळपीर या शाळेतील स्काऊट गाईड युनिट मार्फत संत झोलेबाबा यात्रा महोत्सव महोत्सवानिमित्त सेवा प्रकल्प राबविण्यात आला.

यावेळी यावेळी जिल्हा परिषद परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा पिंप्री खु या शाळेतील विर भगतसिंग स्काऊट पथक व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले गाईड पथकामार्फत संपूर्ण मंदिर परिसरात स्काउट मास्टर संदिप ढोरे यांच्या नेतृत्वाखाली मंदिर व मंदिर परिसरात स्वच्छता करण्यात आली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक दुर्गानंद बहादुरे, गाईड शिक्षिका कु राजश्री



धमके, जेष्ठ शिक्षक श्रीधर कष्टे व सोडगीर सर यांची उपस्थिती होती. मंदिर परिसरात हा उपक्रम प्रथमच राबविला त्याबद्दल भाविक व मंदिर समितीने शाळेचे व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

या सेवा महोत्सवामध्ये. १२ व १२ गाईड विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

## अज्ञात वाहनाची धडक; ३५ वर्षीय युवकाचा मृत्यू!

• सिटी न्युज ब्युरो @ रिसोड •

रिठद पेट्रोल पंप समोरील घटना

वाशीम राज्य मार्गावर रिठद येथील पेट्रोल पंपासमोर अज्ञात वाहनाने दिलेल्या जोरदार धडकेत ३५ वर्षीय युवकाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना दिनांक १० जानेवारी रोजी रात्री ८ वाजताच्या दरम्यान घडली. रुस्तम खा असदखा पठाण वय ३५ वर्ष राहणार आढळ नगर रिठद ता. रिसोड जि. वाशिम असे मृतकाचे नाव असून अपघातानंतर संबंधित वाहन चालक घटनास्थळावरून फरार झाला असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. धडक एवढी जबर होती की रुस्तमखा याचा जागीच मृत्यू झाला. धडक दिल्यानंतर वाहना मध्ये अडकून तब्बल २५ फूट पर्यंत सदर अज्ञात वाहनाने रुस्तम खा यांना फरपटत नेले असल्याचे स्थानिक नागरिकांकडून कळाले आहे. मिळालेल्या




माहितीनुसार, मृतक रुस्तम खा हा युवक पेट्रोल पंपा जवळ असलेल्या एका दुकानातून काम करून आपल्या अन्य साथीदारासह रस्त्याच्या कडेने आपल्या घराकडे जात असतांना वाशिम वरून रिसोडच्या दिशेने येत असलेल्या भरधाव वेगातील अज्ञात वाहनाने त्याला धडक दिली. स्थानिक नागरिकांनी तातडीने मदत करून त्याला उपचारासाठी वाशिमच्या जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले. या अपघातामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. दिनांक ११ जानेवारी रोजी सकाळी शवविच्छेदानंतर मृतदेह परिवारात सुपूर्द करण्यात आले व दुपारी ३ वाजताच्या दरम्यान रुस्तम खा याचा दफनविधी रिठद येथील कब्रस्तानामध्ये करण्यात आला.

## दारू दुकान बंद करा; महिलांचा एल्गार!

### नागरीकांची निवेदनातुन प्रशासनाकडे दुकान हटविण्याची मागणी

• सिटी न्युज ब्युरो @ रिसोड •

शहरातील इंदिरा नगर लोणी रोड रिसोड येथील रहिवाशी आसलेले सदानंद चोपडे, सुनिल गवई, डॉ. अशोक इंगोले, शेख मुजाहिदीन सर्वजित सोळंके, यांनी इंदिरानगर मधील देशीदारूचे दुकाण. हाटविण्याची मागणी निवेदनातून केली आहे. शहरातील इंदिरा नगर येथील राहत आसलेल्या नागरिकांना ये-जा करतांनी रस्त्या लगतच बऱ्याच वर्षापासून देशी दारूचे दुकान आहे. त्या देशी दारूच्या दुकानामुळे सर्व नगर वासियांना खूप त्रास होत आहे रस्त्यावर दारू पिवुन मद्यपी धिंगाणा घालत,



शिवीगाळ करतात त्यामुळे इंदिरा नगर येथील महिलांना व खासकरून शाळेतील मुला मुलींना याचा जाता येता खुप त्रास सहन करावा लागत आहे. या दारूच्या दुकाणामुळे अनेक परिवार उद्धवस्त झाले आहे. नगरातील अनेक तरुण पिढी व्यसनाधीन झाली आहे.

अवघ्या शंभर मीटर अंतरावर शाळा आहे तसेच येथे इंगोले हॉस्पिटल व प्रसुतीग्रह व श्याम मेडिकल असून या रस्त्याने समोर मिलिंद मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह आणि मातंग हरिजन बीसी वसतिगृह आहे यामुळे या रस्त्याने नेहमी विद्यार्थी व विद्यार्थीनी आणि नेहमी महिलांची ये जा असते तसेच आमच्या नगरातील महिला आणि मुलीना शाळेत ये जा करण्यसाठी हा एकमेव मार्ग असुन याचा त्रास येथील महिलांना आणि मुलीना होत आहे. सदर देशीदारूच्या दुकानाला येथील नागरिक खुप त्रस्त झाले आहे. तसेच अनेक दारुडे उभ्याने लघवी व औकारी करून रस्त्यावर घाण करतात. त्यामुळे हे देशी दारूचे ३० दिवसा मध्ये हाटविले नाही तर नागरिकांकडून आंदोलन छेडण्यात येईल. या संदर्भात राज्य उत्पादन शुल्क, जिल्हा पोलिस अधिक्षक, पोलिस निरीक्षक, अकोला लोकसभा खासदार संजय धोत्रे नवचीत नगर अध्यक्ष भगवान दादा क्षीरसागर मुख्याधिकारी यासह निवेदने देण्यात आले आहे.

# रेती तस्कर जोमात, प्रशासन कोमात

• सिटी न्युज ब्युरो @ रिसोड •

रिसोड तालुक्यातील दलाला मार्फत दर दिवसाला असंखा अवैध रेती तस्करी रात्री बारा ते पाच वाजेपर्यंत खुले आम रेती तस्कर होत आहे प्रति ब्रास रेती साठी १०००० ते ११००० रु मोजावे लागत आहे रेती दलाल मनमानी पदतीने मजुरदार शेतकरी घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना लुटत आहे. महसूल विभागातील काही अधिकारी, कर्मचाऱ्यांना दलालांचा बंद दरवाजा आर्थिक आशीर्वाद असल्याचा बोलले जात आहे रेती तस्कर होत असलेल्या राम भरोसे रेती तस्करावर प्रतिक्षा नंतर कार्यवाहीची होणार का?

## राम भरोसे रेती तस्कर, प्रतिक्षा कार्यवाहीची

तालुक्यात विविध योजनांतून मिळालेल्या घरकुलाची आणि ईतर बांधकामे सुरू झाली आहेत. त्यासाठी रेती हा घटक अत्यावश्यक असल्याने अव्वाच्या सव्वा भावात गरजवंतांना रेती विकत घ्यावी लागत असल्याची माहिती समोर येत आहे. या गंभीर बाबीकडे महसूल विभागाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे रेती तस्कर जोमात आले असून सामान्य गोरगरिबांची मात्र आर्थिक पिळवणूक होत असल्याची ओरड होत आहे. यात काही तस्करांचे थेट अधिकाऱ्यांशीच आर्थिक आशीर्वाद असल्याची दबक्या आवाजात चर्चा सुद्धा सुरू आहे. तालुक्यातून वाहणाऱ्या पैनगंगा नदीवरील रेती घाटांचा गेल्या अनेक वर्षांपासून लिलाव झाला नसल्याने हिंगोली, परभणी जिल्ह्यातून



मोठ्या प्रमाणावर अवैध रेती वाहतूक होत आहे. शेजारच्या हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यातून तर बुलढाणा जिल्ह्यातील लोणार व मेहकर तालुक्यातून रेती येत असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे. मेहकर कडून येणारी अवैध रेती सोनाटी, गौढाळा, करंजी, लेहणी, गोभणी, धोडप खुर्द आदी ग्रामीण भागात पडत असल्याची माहिती हाती आली आहे. तर सेनगाव कडून येणारी अवैध रेती रिसोड मालेगाव रस्त्यावरील खडकी, लिंगा, किनखेडा, देगाव, पेनबोरी आदी गावात पोहचत आहे मंठा, परभणी जिल्ह्यातून येणारी रेती लोणी, भर, मांडवा, मोहजा बंदी रिसोड शहरात येत असल्याचे दिसून येत आहे. बांधकामासाठी अत्यावश्यक असलेली रेती चोरट्या मार्गाने येत असल्यामुळे रेती तस्कर अव्वाच्या सव्वा भावात रेती विकत आहेत. धनदांडग्यांना याचे काहीही सोयरसुतक नसले तरी गोरगरिबांची मात्र आर्थिक पिळवणूक होत आहे. कारण घरकुलांचे कामे रखडल्यामुळे अनुदानाचे पुढील हप्ते खोळंबले आहेत. त्यामुळे गरीब लाभार्थ्यां द्विधा संकटात सापडले आहेत. त्यासाठी त्यांना मिळेल त्या भावात रेती खरेदी करून बांधकाम सुरू करावे लागत आहे. याच संधीचा गैरफायदा घेत रेती तस्कर मनमानी भावात रेती विकत असल्याची धक्कादायक माहिती पुढे येत आहे. दिवसागणिक रेतीची मागणी वाढत असल्याने रेती तस्करी जोमात सुरू झाली आहे. या गंभीर प्रकारावर सबंधित प्रशासनाचा कुठलाही अंकुश न राहिल्याने रेती तस्कर' सैराट' झाले असल्याची खळबळ जनक बोंब सर्वत्र होतांना दिसत आहे. याकडे महसूल विभागाने लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.

## मकरसंक्रांतीला महिला बचत गटांच्या कर्तृत्वाची गोड चव

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

कौशल्याने तयार केलेले नाविन्यपूर्ण व आरोग्यदायी खाद्यपदार्थ सध्या नागरिकांच्या विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहेत.

महिलांच्या आर्थिक सबलीकरणाला चालना देण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आलेले चिया तिळगुळ लाडू, चिया तीळ वडी व चिया न्यूट्री बार हे पदार्थ पौष्टिकतेसोबतच चवीलाही तितकेच उत्कृष्ट ठरणार आहेत. या उत्पादनांमध्ये चिया बिया, तीळ, गूळ यांसारख्या नैसर्गिक व आरोग्यास पोषक घटकांचा वापर करण्यात आला असून कोणत्याही कृत्रिम रंग, स्वाद किंवा संरक्षकांचा वापर टाळण्यात आला आहे. त्यामुळे लहानांपासून वृद्धांपर्यंत सर्वांसाठी हे पदार्थ लाभदायक ठरणार आहेत. विशेषतः बदलत्या जीवनशैलीत आरोग्याची काळजी घेणाऱ्या नागरिकांकडून या उत्पादनांना मोठी पसंती मिळत आहे. दिनांक १३ व १४ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम तसेच




वाशिम शहरातील प्रमुख चौकांमध्ये या आरोग्यदायी पदार्थांची विक्री करण्यात येणार आहे. या उपक्रमातून महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होत असून त्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होणार आहे. स्थानिक पातळीवर तयार होणाऱ्या उत्पादनांना बाजारपेठ मिळाल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही बळ मिळणार आहे. नागरिकांनी या उपक्रमास भेट देऊन महिलांच्या कष्टाला दाद द्यावी, आरोग्यदायी व स्थानिक उत्पादनांची खरेदी करावी, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
सोमवार, दि. १२ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# घराणेशाही मोडून सर्वसामान्यांचे नेतृत्व प्रस्थापित करा

## ♦ प्रभाग ३ मध्ये वंचित नेत्या अंजलीताई आंबेडकरांचे आवाहन

प्रतिनिधी १२ जानेवारी






**अकोला :** 'ज्यांच्या घराण्यात पंजोबा, आजोबा, वडील आणि मामा सत्तेत बसले आहेत अशा घराणेशाहीला थारा न देता, सर्वसामान्य कुटुंबातील कार्यकर्त्यांना सत्तेच्या प्रवाहात आणणे हेच वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. आपल्या भागातील समस्यांची जाण असणाऱ्या आणि एका फोनवर धावून येणाऱ्या सुशिक्षित उमेदवारांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहा,' असे आवाहन वंचित बहुजन आघाडीच्या नेत्या प्रा. अंजलीताई आंबेडकर यांनी केले. न्यू तापडिया नगर येथे निलेश देव यांच्यासाठी आयोजित प्रचार सभेत त्या बोलत होत्या. निलेश देव यांच्याकडे कुठले ही पद नसताना ते लोकहितासाठी लोकसेवक म्हणून काम करत होते. जनतेने खऱ्या लोकसेवकला महापालिकेत पाठविण्याची गरज प्रा.अंजलीताई आंबेडकर यांनी व्यक्त केली.

प्रभागातील पाणी समस्या आणि विकासकामांवर भाष्य करताना प्रा.अंजलीताई म्हणाल्या की, 'पूर्वी धनश्री देव यांनी निवडून आल्यानंतर न्यू तापडिया नगरमधील पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात सोडवली होती. कोविड मध्ये धनश्री देव यांचे निधन झाल्यावर विकास कामांसाठीचा निधी भाजपने दिला नाही. त्या आधारे सध्या भाजपच्या वतीने निलेश देव यांच्या विरोधात जो गैरसमज पसरवला जात आहे, तो निव्वळ राजकीय द्वेषातून सुरू आहे. प्रत्यक्षात या भागातील रेल्वे उड्डाणपुलाचा प्रश्न केवळ वंचित बहुजन आघाडीनेच लावून धरला होता. त्यासाठी निलेश देव सातत्याने पाठपुरावा करत आहे. नागरिकांना उन्हातान्हात तासनतास थांबावे लागू नये म्हणून निलेश देव आणि कार्यकर्त्यांनी पुढाकार घेऊन तिथे सावलीची व्यवस्था केली होती.' प्रभाग ३ मध्ये उभे असलेले चारही उमेदवार तुमच्यातले आहेत, कष्टकरी आहेत आणि नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी सक्षम आहेत. त्यामुळे येणाऱ्या १५ तारखेला या उमेदवारांच्या 'गॅस सिलेंडर' या चिन्हासमोरील बटण दाबून त्यांना प्रचंड मतांनी विजयी करा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. या सभेला प्रभागातील नागरिक, महिला आणि तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### खाजगी करवसुलीला आमचा विरोध आणि यश

◆अकोला महानगरपालिकेने लादलेल्या वाढीव करावर टीका करताना अंजलीताईंनी सांगितले की, 'इतर शहरांच्या तुलनेत अकोलेकरांवर कराचा मोठा बोजा टाकण्यात आला आहे. करवसुलीसाठी खाजगी कंपनी नेमून सर्वसामान्यांची पिळवणूक केली जात होती. या अन्यायकारक निर्णयाविरोधात वंचित बहुजन आघाडीने सातत्याने आंदोलने केली आहेत आणि स्वाती इंडस्ट्रिज विरोधातील निलेश देव आणि वंचित चे आंदोलन यशस्वी झाले. खाजगी कर वसुली गुंडाळण्यात आली. वाढलेल्या कर विरोधात वंचित निश्चित कमी करण्याचे वजन देत आहे. इतकेच नाही तर इतर मेट्रो शहरांपेक्षा जास्त कर अकोल्यात वसुल केला जात आहे. पण, सुविधा मात्र नाही हा अकोलेकरांवर अन्याय असल्याचे प्रा.अंजलीताई आंबेडकर म्हणाल्या.

# महानगराच्या विकास संदर्भात तडजोड नाही : आमदार रणधीर सावरकर



प्रतिनिधी १२ जानेवारी

**अकोला :** रेल्वे गेटवर होणाऱ्या त्रासाबद्दल माजी केंद्रीय मंत्री नामदार संजय भाऊ धोत्रे यांनी डाबकी रोड उड्डाणपूल ची निर्मिती केली राहिलेल्या कामासाठी राज्य शासनाकडे आपण निधी आणून या भागाचा विकास केला. पालखी मार्ग दुरुस्ती करण्याचे काम सुरू आहे. या शहरातील हद्दवाढ क्षेत्रात नव्वद टक्के कामे पूर्ण करण्यात आली असून पाण्याची समस्येसाठी अमृत योजनेचे काम युद्धस्तरावर सुरू आहे. या भागात पथदिवे तसेच प्रत्येक गल्लीमध्ये रस्त्यांची व्यवस्था करण्याची किमया भाजपाने केली असून शहराचा विकास २५ वर्षाचा आराखडा भारतीय जनता पक्षाने केला आहे. त्यामुळे भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करा अशी आव्हान आमदार रणधीर सावरकर यांनी केले प्रभात आठ मधील उमेदवार तुषार भिरड, माधुरी क्षीरसागर ,राजेश्वर धोटे, रंजना विंचनकर यांना सेवेची संधी द्या मूलभूत सुविधा आणि नागरिक सुविधा सोडण्याची हमी मी घेतो अशा शब्दात आमदार रणधीर सावरकर यांनी मतदारांशी संवाद साधला. हिंदुत्व आणि राष्ट्रीयत्व च्या माध्यमातून या शहराची संस्कृती विकास नवीन एमआयडीसी विमानतळ पशुवैद्य महाविद्यालय क्रीडा सांस्कृतिक भवन, आरोग्याची सेवा तसेच युवकांसाठी अभ्यासिका उभारण्याचा निर्णय उभारण्याचा निर्णय घेतला आहे या निर्णयाला पाठबळ देण्यासाठी भारतीय जनता पक्ष राष्ट्रवादी काँग्रेसच्या अकोला शहरातील सर्व उमेदवारांना विजयी करा. अकोला महानगरपालिकेला विकसित गतिशील करण्यासाठी आणि विश्वासाची पार्टी म्हणून भारतीय जनता पक्ष यांच्याकडे जबाबदारी टाका जबाबदारी टाका असे आव्हान यावेळी आमदार सावरकर यांनी केले. यावेळी त्यांच्यासोबत विजय अग्रवाल, डॉ. अमित कावरे, जयंत मसने, तेजराव पाटील, किशोर पाटील , कृष्णा शर्मा, मोहन भिर भिरड, रमण पाटील, विलास शेळके, भानुदास येन्नावार, गिरीराज तिवारी, विवेक भरणे, किशोर कुचके, पुरुषोत्तम सावरकर, रवी दुतोंडे संजय तिकांडे उपस्थित होते.

# लाडक्या बहिणींना विरोध करणाऱ्यांचे मनसुबे ओळखा : खासदार अनुप धोत्रे

प्रतिनिधी १२ जानेवारी



**अकोला :** अकोला महानगरपालिकेची निवडणूक ही दिशादर्शक असून ही सामाजिक दायित्वा सोबत अकोलेकरांना व ग्रामदेवत राजेश्वर मंदिरावर हल्ला करणाऱ्या तत्त्वांच्या विरोधात आहे. प्रत्येक राष्ट्रभक्तांनी भारतीय जनता पक्षाच्या पाठीशी आपले मतभेद विसरून उभे राहावे. जाती धर्म पेक्षा मानवता धर्म आणि अकोलेकर ही भावना लक्षात घेऊन भारतीय जनता पार्टी आणि राष्ट्रवादी युतीला विजयी करा असे आवआह खासदार अनुप धोत्रे यांनी केले.

प्रभाग १२, १९, १७, १८, १६,१९, येथे जनसंपर्क अभियानात ते बोलत होते. अजय शर्मा, एड. कल्पना गोट फोडे, संतोष डोंगरे, संगीता भरगड, योगिता पावसाळे धनंजय धबाले, माधुरी बडोने, गजानन सोनवणे, सिद्धार्थ उपरवट संजय बडोणे, डॉक्टर मुस्कान पजवाणी, कविता देशमुख, दिलीप मिश्रा, सरिता कांबळे, अमोल गोगे, अमोल मोहकार, करण शाहू, शितल दाबेराव, वैशाली कहाकर यांच्या प्रचारार्थ जनसंपर्क अभियानात ते बोलत होते. भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीला विजयी करा तसेच लाडकी बहीण योजनेचा विरोध करणारे काँग्रेस आणि उबाठा सेना कोर्टात गेली होती. आताही मकर संक्रांतीला लाडकी बहिणीला तीन हजार रुपये मिळू नये यासाठी कोर्ट आणि वेगवेगळे मार्ग स्वीकारत आहे. अशा तत्त्वापासून सावध रहा आणि भारतीय जनता पार्टी राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीला विजयी करा. शहराच्या विकासासाठी, रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी पिण्याच्या पाण्यासाठी आरोग्याच्या सुविधा मिळवण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या पाठीशी उभे रहा असे आवाहन खासदार अनुप धोत्रे यांनी केले.

# समाजसेवेचे सोंग घेणाऱ्यांपासून सावध रहा

प्रतिनिधी १२ जानेवारी

## ♦ भाजपच्या लोकप्रतिनिधींचे आवाहन

**अकोला :** महाविकास आघाडीचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे असताना मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत मदत बंद झाली होती. ती मदत देवेंद्र फडणवीस यांच्या काळात सर्वात अधिक मदत देऊन रुग्णांनाच संजीवनी देण्याचं काम व सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्याचे काम भारतीय जनता पक्ष युतीने केले आहे. या निवडणुकीत बेगडी समाजसेवकांचे पीक आलेले दिसत आहे. त्यांच्या पासून सावध राहा असे आवाहन भारतीय जनता पक्षाच्या लोकप्रतिनिधींनी केले.

मी आणि माझा परिवार असे म्हणणारे, कोविड काळात घरात बसणारे आता समाजसेवेचे सोंग घेऊन आले आहे, अशा तत्त्वापासून सावध राहण्यात हित आहे. कोविड काळामध्ये भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते राम रोटी, रामप्रसाद, नमो थाली तसेच वेगवेगळ्या उपक्रमासोबत आरोग्याच्या सुविधा सर्वसामान्यांच्या नागरिकांच्या सेवेमध्ये उपलब्ध होते.

तसेच विकासाचा संकल्प घेऊन राष्ट्रीय विचारसरणी घेऊन अकोल्याचा स्वाभिमान कायम ठेवण्यासाठी रस्त्यावर होते. अशा पक्षाला महानगरपालिकेमध्ये सेवेची संधी द्या असे आवाहन आमदार वसंत खंडेलवाल, आमदार हरीश पिंपळे, आमदार प्रकाश भारसाकळे, सिद्धार्थ शर्मा, एड. सुभाषसिंग ठाकूर, मदनलाल खंडेलवाल, पंडित कुलकर्णी, डॉ. अभय जैन, डॉ. राजेश देशपांडे, डॉ. प्रशांत अग्रवाल, डॉ. किशोर मालोकार, डॉ. सुमित फोकमारे, डॉ. राजेश अग्रवाल यांनी केले.

# अकोल्यात शिवसेना उमेदवार श्वेता बाजड यांचा झंझावात

## ♦ प्रभाग १५ (क) मध्ये 'धनुष्यबाणा'चा जयघोष, जनसमर्थनाचा महापूर

प्रतिनिधी १२ जानेवारी



**अकोला :** महानगरपालिकेच्या रणधुमाळीत प्रभाग क्रमांक १५ (क) सध्या संपूर्ण शहराच्या चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे. शिवसेना (शिंदे गट) आणि महायुतीच्या अधिकृत उमेदवार श्वेता लक्ष्मीकांत बाजड यांच्या प्रचाराने आता जनआंदोलनाचे स्वरूप धारण केले असून, प्रभागात त्यांना मिळणारा जनपाठिंबा पाहून विरोधकांच्या गोटात चांगलीच अस्वस्थता पसरली आहे.

प्रभागातील प्रत्येक गल्लीत आणि कोपऱ्यात श्वेता बाजड यांचे जंगी स्वागत होत आहे. एक सुशिक्षित, संयमी आणि कामाची तळमळ असलेला चेहरा म्हणून महिला वर्ग त्यांच्याकडे मोठ्या आशेने पाहत आहे. 'प्रभागाचा सर्वांगीण विकास आणि महिलांचे सक्षमीकरण हेच माझे ध्येय आहे,' हा त्यांचा शब्द मतदारांच्या मनाला भिडत असून, पदयात्रेदरम्यान त्यांना मिळणारे प्रेम हे त्यांच्या विजयाची नांदी मानली जात आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारांचा वारसा घेऊन श्वेता बाजड मैदानात उतरल्या आहेत. प्रभागातील रस्ते, पाणी, स्वच्छता आणि प्रलंबित नागरी प्रश्न सोडवण्यासाठी त्या कटिबद्ध आहेत. 'आम्हाला केवळ लोकप्रतिनिधी नको, तर आमच्या प्रश्नांची जाण असलेला हक्काचा माणूस हवा आहे,' अशी भावना प्रभागातील ज्येष्ठ नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# 'मशाल' पेटवून प्रभाग 13 चा कायापालट करणार

## ♦ शिवसेना (उबाठा) निवडणुकीच्या मैदानात



प्रतिनिधी १२ जानेवारी

**अकोला :** महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीत प्रभाग क्रमांक १३ हा अत्यंत महत्वाचा प्रभाग आहे. प्रभाग क्रमांक १३ मध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने जोरदार मुसंडी मारली आहे. पक्षाचे अधिकृत उमेदवार देवराव सोनाजी अहीर, सौ. दामिनी अक्षय नागापुरे, अ?ड. दिपाली रमण जानोरकर आणि गोपाल परमेश्वर बिल्लेवार यांनी आपला जाहीरनामा प्रसिद्ध करत मतदारांशी संवाद साधला आहे.

प्रभाग तेराच्या विकास कामांसाठी विकासाचे १० कलमी आश्वासन शिवसेनेच्या उमेदवारांनी दिले आहे. शिवसेनेने आपल्या प्रचारात स्थानिक समस्यांना केंद्रस्थानी ठेवले असून खालील प्रमुख आश्वासने दिली आहेत. यात कृषि नगर रहिवाशांचे प्रश्नावर फोकस केला आहे. या परिसरातील जागा नावावर करून घरकुल मिळवून देण्याचे वचन शिवसेना उमेदवाराने दिले आहे. शिवर ते बस स्टँड या मार्गावर नियमित 'सिटी बस' सेवा सुरू करणार असे ठोस आश्वासन दिले आहे. मनपा शाळांचा दर्जा सुधारणे, प्रभागात रुग्णवाहिका आणि वैकुंठरथ (शव पेटी) उपलब्ध करून देणे, जन्म-मृत्यू दाखले, रेशन कार्ड यांसारखी कागदपत्रे स्थानिक स्तरावर उपलब्ध करून देणे, निराधार, अपंग आणि विधवांच्या मानधनात नियमितता आणण्यासाठी प्रयत्न आदी आश्वासन दिले आहे. या प्रभागातून शिवसेनेने अनुभवी आणि अभ्यासू चेहऱ्यांची निवड केली आहे. यामध्ये देवराव अहीर यांच्या रूपाने अनुभवी नेतृत्व, तर अॅड. दिपाली जानोरकर यांच्या रूपाने कायदेशीर जाण असलेले उमेदवार रिंगणात आहेत. महिलांच्या समस्यांसाठी सौ. दामिनी नागापुरे आणि युवकांसाठी गोपाल बिल्लेवार सक्रिय राहणार आहेत. 'प्रभागातील प्रत्येक नागरिकाला मूलभूत सुविधा मिळवून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत असे उमेदवारांनी स्पष्ट केले आहे. मतदारांनी 'मशाल' या चिन्हासमोरील बटण दाबून आम्हाला भरघोस मतांनी विजयी करावे,' असे आवाहन उमेदवारांच्या वतीने करण्यात आले आहे.





प्रभाग क्रमांक १२ ड मध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार सागर भारूका यांना मतदारसंघात जोरदार प्रतिसाद मिळत आहे. रविवारी रात्री सागर भारूका यांची प्रचार सभा झाली. फटाके फोडून भारूका यांचे स्वागत करण्यात आले. तसेच सभेला देखील या भागातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सागर भारूका यांची जनतेचा नेता म्हणून प्रतिमा तयार झालेली दिसत आहे.

# प्रभाग क्र. ५ मधून शिवसेना (शिंदे गट) कडून छायाताई अरुण इंगळे यांच्यामुळे वाढली चुरस

प्रतिनिधी १२ जानेवारी



**अकोला :** महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ चा बिगुल वाजला असून, राजकीय हालचालींना वेग आला आहे. प्रभाग क्रमांक ५ (अ) मधून शिवसेना पक्षाच्या अधिकृत उमेदवार म्हणून श्रीमती छायाताई अरुण इंगळे यांचे नाव जाहीर करण्यात आले असून त्यांच्या प्रचाराने आता जोर धरला आहे.

छायाताई इंगळे या प्रभागातील एक परिचित चेहरा असून, त्यांनी 'विकासाची शान' असे ब्रीदवाक्य घेऊन निवडणूक रिंगणात उडी घेतली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील जनहितार्थ योजना, विशेषतः 'लाडकी बहीण' योजनेचा प्रभाव या प्रचारात प्रकर्षाने दिसून येत आहे. 'प्रभागाची लाडकी बहीण' म्हणून त्या मतदारांपर्यंत पोहोचत आहेत. प्रभाग पाच अ मधून धनुष्यबाण या निशाणीवर त्या निवडणुक लढवित आहे. प्रचारादरम्यान छायाताई इंगळे यांनी प्रभागातील मूलभूत सोयीसुविधा, रस्ते, पाणी आणि महिला सक्षमीकरण या मुद्द्यांवर भर दिला आहे. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदर्शावर चालून प्रभागाचा कायापालट करण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला आहे.शिवसेनेच्या कार्यकर्त्यांकडून 'धनुष्यबाण या निशाणीसमोरील बटन दाबून छायाताईंना प्रचंड बहुमताने विजयी करा,' असे आवाहन मतदारांना केले जात आहे. महापालिकेच्या या प्रभागातील ही निवडणूक चुरशीची होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.




हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK